गुरुवार, १५ जून २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२७३
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • THURSDAY 15 JUNE 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-273 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5

# बिपरजॉय पावसासाठी पूरकच

## आज सायंकाळी चक्रीवादळ धडकेल जाखू बंदरात

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** बिपरजॉय चक्रीवादळाचा वेग मंदावला आहे. मागील तीन दिवसांपासून चक्रीवादळाची अधिक हालचाल झालेली नाही. गुजरातसह महाराष्ट्रात या चक्रीवादळाचा परिणाम दिसून येत आहे. या दोन्ही राज्यातील अनेक जिल्ह्यात वादळी वाऱ्यांसह पावसाने बुधवारी हजेरी लावली आहे. बिपरजॉय चक्रीवादळ गुजरातच्या किनारपट्टीकडे वाटचाल करीत आहे. चक्रीवादळ गुरुवारी सायंकाळी चार ते रात्री आठ वाजण्याच्या दरम्यान जाखू बंदराच्या उत्तरेकडील भागात धडकेल. चक्रीवादळ मोसमी पावसासाठी पूरकच ठरले आहे, अशी माहिती हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी दिली.



पत्रकार परिषदेत पुढे बोलताना डॉ. महापात्रा म्हणाले की, चक्रीवादळ गुरुवारी सायंकाळी चार ते आठ वाजण्याच्या दरम्यान जाखू बंदराच्या उत्तरेकडील भागात धडकेल. या वेळी वाऱ्याचा वेग १५० किलोमीटर प्रती तासांवर जाण्याची शक्यता आहे. कच्छ परिसराला वेगवान वारे आणि अतिवृष्टीचा सर्वाधिक फटका बसेल. कच्छसह देवभूमी द्वारका, मोरबी, पोरबंदर, राजकोट परिसरात १२५ ते १३५ किलोमीटर वेगाने वारे वाहील. वाऱ्याचा वेग ताशी १४५ किलोमीटरपर्यंत जावू शकतो. कच्छ आणि देवभूमी द्वारका जिल्ह्यांत सर्वाधिक हानी होऊ शकते. गुजरातच्या अन्य भागात पावसाची शक्यता आहे. राज्यस्थान दक्षिण भागातही मुसळधार पावसाचा अंदाज आहे. चक्रीवादळ गुरुवारी सायंकाळी जाखू बंदर परिसरात धडकेल. त्यानंतर वाऱ्याचा वेग हळूहळू कमी होऊन चक्रीवादळाचा प्रभाव संपून जाईल. साधारण अठरा जूनपर्यंत चक्रीवादळाचा प्रभाव राहील. १८ जून ते २१ जून दरम्यान मोसमी वारे वेगाने वाटचाल करून संपूर्ण दक्षिण भागात व्यापून पुढे वाटचाल करतील. केरळमध्ये उशिराने दाखल झालेला मोसमी पाऊस चक्रीवादळामुळे वेगाने पुढे सरकला. चक्रीवादळाचा प्रभाव संपताच मोसमी वाऱ्यांचा वेग आणखी वाढेल. चक्रीवादळ ओमानच्या दिशेने गेले असते तर मोसमी वाऱ्यांच्या प्रगतीला अडथळा निर्माण झाला असता. मात्र, देशाच्या किनारपट्टीकडे सरकल्यामुळे देशाच्या काही भागात चांगला पाऊस होईल.

**मोसमी पावसाची मोजणी कशी होते :** देशात नैर्ऋत्य मोसमी पाऊस दाखल झाल्यापासून, तो पूर्णपणे माघारी जाईपर्यंत देशात पडणारा पाऊस मोसमी पाऊस म्हणूनच गणला जातो . मोसमी पाऊस म्हणूनच त्यांची मोजणी होते . या काळात चक्रीवादळ, वादळ, स्थानिक वातावरणाचा परिणाम म्हणून पाऊस पडला तरीही त्याची गणना मोसमी पावसातच केली जाते, असेही महापात्रा म्हणाले .

## चर्चेतली बातमी

# त्यांच्यामुळेच तुम्हाला मंत्रिपदे : गायकवाड

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** एकनाथ शिंदे व 50 आमदार हे वाघ आहेत, या वाघांनी उठाव केला तेव्हा कुठे भाजपच्या लोकांना मंत्रिमंडळात स्थान मिळाले. या मुख्यमंत्र्यांची ताकद आणि वाहवा पचविण्याची हिम्मत भाजपच्या लोकांनी ठेवायला पाहिजे. त्यांना त्यांच्या भाषेत सांगायचे म्हटले तर 1987 ला भाजपचे फक्त दोनच खासदार होते. आज ते पण हत्ती झाले आहेत. एकनाथ शिंदे यांच्याबद्दल जर असे भाजपचे मंत्री बोलत असतील तर त्यांच्या वरिष्ठांनी लक्ष घातले पाहिजे. ठाण्याविषयी बोलताना तुम्ही किती होते... ? कुणाच्या संगतीने महाराष्ट्रात आले .. ? याचा सुद्धा भासजपाने विचार करायला पाहिजे. भाजपाचे खासदार अनिल बोंडे यांच्यासारख्यांनी एकनाथ शिंदे यांच्याबद्दल बोलताना तारतम्य बाळगले पाहिजे, अशी प्रतिक्रिया शिंदे गटाचे आ. संजय गायकवाड यांनी दिली. भाजपने आपल्या औकातीत रहावे, असा इशाराही यावेळी गायकवाड यांनी दिला. अब्दुल सत्तार यांनी चांगले काम केले आहे. कालच्या बैठिकीत मी सोबत होतो, तसे काहीही घडले नाही. अब्दुल सत्तार यांना बदनाम करण्याचं प्रयत्न केला जास्त आहे. अकोला येथील रेड सुद्धा मुख्यमंत्र्यांना विचारून टाकली होती. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी सत्तार यांना झापले वगैरे नाही, असे ते म्हणाले.



# एक हजार महिलांनी केली अमृत पाणीपुरवठा योजनेची पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** केंद्र सरकारला नऊ वर्षे पूर्ण झाले असून, विशेष जनसंपर्क अभियान सुरू आहे. केंद्र सरकारने शहरासाठी २७००कोटी रुपये खर्च करून अमृत मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेची कामे सुरू आहेत.

विकासतीर्थ यात्रा अभियानांतर्गत शहरातील एक हजार महिलांनी पाणी पुरवठा योजनेस भेट देऊन सुरू असलेल्या कामाची पाहणी केली व समाधान व्यक्त केले. डिसेंबर 2024 पर्यंत चोवीस तास पिण्याचे पाणी उपलब्ध होईल, असा विश्वासही व्यक्त केला.

महानगरपालिकेच्या नऊ बसमधून शेकडो महिला विकास तीर्थ दौऱ्यात सहभागी झाल्या होत्या. यावेळी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ.भागवत कराड, शहर जिल्हाध्यक्ष शिरीष बोराळकर यांनी भारतीय जनता पार्टीच्या संपर्क कार्यालयापासून एस. टी.बसला झेंडा दाखवून पैठणकडे रवाना केल्या.

नवीन पाणी पुरवठा योजनेद्वारे शहरातील प्रति नागरिकास १३५ लिटर याप्रमाणे एकूण ३२ लाख लोकसंख्येला ६९२ दशलक्ष लिटर पाणी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे चोवीस तास पाणी शहराला मिळणार आहे. सध्या शहराला ११० एम. एल.डी. पाणी मिळते, त्यात गळतीचे प्रमाण तीस ते पस्तीस टक्के इतके असल्याने पाण्याची टंचाई सुरू आहे. त्यामुळे अमृत मिशन पाणीपुरवठा योजना ही शहराची विकासची लाईफ लाईन राहणार आहे.

पाहणी दौऱ्यामध्ये संभाजीनगर पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे प्रमुख राजू शिंदे, पैठणचे नगराध्यक्ष विकास लोळगे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता कोळी, अनुसूचित जातीचे जालिंदर शेंडगे,मोहन अघाव, नगरसेवक महेश माळवतकर, बालाजी मुंडे ,लक्ष्मीकांत थेटे ,युवा मोर्चाचे हर्षवर्धन कराड, साहेबराव निकम, अरुण पालवे, महेश मल्लेकर, संदीप साळवे ,रोहित साळवे, मंडळ अध्यक्ष सागर पाले, सागर निळकंठ, महिला मोर्चाच्या अमृताताई पालोदकर, माधुरीताई आदवंत, मीना ताई मिसाळ, लताताई दलाल, नगरसेवक मनीषा ताई मुंडे, सुनीता ताई माळवतकर यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी आणि महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नक्षत्रवाडी येथे सुरू असलेल्या वाटर ट्रीटमेंट प्लांट ( जलशुद्धीकरण केंद्र ) कामाची पाहणी केली. आणि कामाविषयी माहिती जाणून घेतली. किमान सहा मोठ्या एम टी.पी. प्लांट मधून ४९२ एम.एल. डी.पाण्यावर शुद्धीकरण करण्यात येणार असून बावन्न टाक्याद्वारे पाणी वितरित होणार आहे.नागरिकांना २४ तास पिण्याचे पाणी नळाला उपलब्ध होणार आहे. नाथ जलाशयामध्ये मुख्य किनाऱ्यापासून दीड कि.मी. अंतरावर जॅकवेल उभारणी सुरू असून, त्याठिकाणी नाथ जलाशयात कॉफर डॅमची उभारणीचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे.पावसाळ्यामध्ये धरणातील पाणी पातळी वाढली तरी पण, जॅकवेलचे काम विनाअडथळा सुरू राहणार आहे. जॅकवेलपर्यंत पोहोचण्यासाठी रस्त्याचे काम सुरू आहे.१८३ पिलर उभे करण्यात आले आहे. या ठिकाणी २६०० एच.पी. ६ मोटरी द्वारे दिवसाला ३९२ एम.एल.डी. लिफ्ट करण्यात येणार आहे, असे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

नाथसागर ते नक्षत्र वाडी ३९ किलोमीटरची मुख्य जलवाहिनीचे आस्तारीकरण काम सुरू असून,या ठिकाणी ही भेट दिली. ४५ कि.मी. जिंदाल आणि वेल्सन कंपनीचे २५०० मीटरव्यासाचे पाईप टाकण्यात येत आहे.जवळपास वीस किमी काम पूर्ण झाले आहे.

शहरातील नागरिकांना डिसेंबर २०२४ पर्यंत २४ तास पाणी कसे उपलब्ध होईल , यासाठी काम सुरू आहे असे , डॉ . कराड यांनी यावेळी म्हटले .शहर पाणी पुरवठा योजनेची कामे प्रगती पथावर असून,लवकरच शहराला पाणी मिळणार असल्याने महिलांनी देखील समाधान व्यक्त केले . सर्व महिलांनी केंद्र सरकारच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या योजनेची माहिती सर्व सामान्य नागरिकांना द्या ,असे शहर भाजपा महिला मोर्चच्या जिल्हा अध्यक्ष अमृता ताई पालोदकर यांनी म्हटले आहे .

# हॉटेलचे जेवण मागवून भाजपाची 'टिफिन नौटंकी'


## काँग्रेसचा आरोप : मोदींच्या ९ वर्षांच्या कारभाराने 'गरिबांचे मरण'

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भारतीय जनता पक्षाला निवडणुका आल्या की जनतेची आठवण येते व इव्हेंटबाजी करुन जनतेचे कैवारी असल्याचा आव आणतात. आताही निवडणुकांचे दिवस सुरु असल्याने भाजपा नेते टिफिन बैठका घेत आहेत. भाजपाच्या आशिर्वादाने देशातील जनता महागाईने एकवेळचे जेवणही करु शकत नाही आणि भाजपा नेते मात्र फाईव्ह स्टार हॉटेलमधील जेवण मागवून टिफीन बैठका घेण्याची नौटंकी करत आहेत, असा हल्लाबोल प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केला आहे.

यासंदर्भात बोलताना अतुल लोंढे म्हणाले की, भाजपाने 'चाय पे चर्चा' नंतर आता 'टिफिन बैठकी'चा नवा फंडा आणला आहे. नरेंद्र मोदी सरकारला ९ वर्ष झाल्यानिमित्त भाजपाने खायचा हा नवा फंडा आणला आहे. ९ वर्षे भाजापाने भ्रष्टमार्गाने खा-खा खाल्ले तरीही त्यांना पुन्हा खायचेच डोहाळे लागले असून टिफिन बैठकांच्या नावाखाली मस्त पार्ट्या झोडत आहेत. खाद्यतेल ८० रुपयांवरून २०० रुपये लिटर, आटा २८ रुपयांवरून ४० रुपये किलो, दूध ४० रुपयांवरून ६० रुपये लिटर, डाळी १५० रुपये किलो तर गॅस सिलिंडर ४५० वरुन १२०० रुपये झाले असल्याने सामान्य जनता महागाईत होरपळून निघत आहे. रोजगार घटत आहेत, शेतमालाला भाव नाही. आणि '९ वर्षे सेवा, सुशासन आणि गरिब कल्याणाची' असे म्हणत भाजपा गरिबांची थट्टा करत आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणारे शेतमालाला हमी भाव देण्याचे आश्वासन देणारे नरेंद्र मोदी सत्तेत आल्यानंतर शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट झाले नाही परंतु आत्महत्या मात्र दुपटीपेक्षा जास्त वाढल्या आहेत. बेरोजगारी प्रचंड वाढली आहे, तरुणांच्या हाताला काम नाही.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

तिचे भाळ जणू आभाळ होते आणि बटा होतात पक्षी. पदरावर विविध रंगी नक्षी लेऊन ती येते. आता तिला मात्र ओढ असते ती आपल्या घराची. रात्रीच्या अंधारात जशी पहाटेची वाट आपण बघत असतो, तशीच दिवसभराच्या श्रमाच्या, धकाधकीच्या जीवनात सायंकाळची वाट आपण आपण पाहत असतो. आपल्या उबदार घरट्याकडे परत फिरण्याची ही वेळ असते. पक्षी आपल्या घरट्याकडे निघतात. एखादी आई आपल्या मुलांची वाट पाहत असते. तिच्या ओठांवर नकळत शब्द येतात, ' या चिमण्यांनो परत फिरा रे, घराकडे अपुल्या, तिन्हीसांजा जाहल्या...' प्रेमीजनांच्या मनात हुरहूर दाटून येते. आपल्या प्रिय व्यक्तीची ओढ जीवाला बेचैन करते. पावसाळ्याचे दिवस असतील तर तिच्या ओठातून गीत प्रकटते

श्याम हुई चढ आई रे बदरिया अब हूँ न आये मेरे श्याम सांवरिया तर दुसरी एखादी प्रेयसी आपल्या प्रियकराची भेट नाही म्हणून म्हणते आहे. ये शाम की तन्हाईयां ऐसे में तेरा गम... झाडांच्या पानांची सळसळ झाली तरी तिला आपली प्रिय व्यक्ती आल्याचा भास होतो. ' आह ' या चित्रपटातलं हे गीत लता मंगेशकर यांनी गायिलेले आहे आणि पडद्यावर अभिनेत्री नर्गिसवर चित्रित झालं आहे. या गाण्यातली विरहिणीची व्याकुळता, आर्तता मन पिळवटून टाकणारी आहे. एखादी विरहिणी कुठे तरी आपल्या प्रिय व्यक्तीची ती वाट पाहत असते. मावळत्या सूर्याच्या साक्षीने त्याच्या आठवणी ती जागवते. ' जिथे सागरा धरणी मिळते, तिथे तुझी मी वाट पाहते...' हा मावळता दिनकर आपल्या प्रिय व्यक्तीला नक्कीच भेटवेल अशी आशा तिच्या मनात असते. पुन्हा एक कवीवर्य भा रा तांबेंची कविता मला आठवते. ही कविता लतादीदींनी आपल्या अमृतासमान गोड आवाजात गाऊन अमर केली आहे. मराठी रसिकांच्या हृदयात या कवितेने घर केले आहे. ही कविता आहे ' तिन्हीसांजा सखे मिळाल्या, देई वचन तुला....' या कवितेतला प्रियकर प्रेयसीला वचन देतो आहे. तो संध्यासमयीला तिचा हात हातात धरून म्हणतो, 'आजपासुनी जिवे अधिक तू माझ्या हृदयाला...'



## आनंदी पहाट

## अध्यात्म हा अंतर्गत शक्तीचा स्त्रोत

आधुनिक केसरी

सध्याची परिस्थिती, त्या परिस्थितील सर्व सामान्य मनुष्य, त्यांच्या अडीअडचणी, त्या अडचणींच्या निवारणार्थ शोधात असलेल्यांची मानसिकता ह्या विषयांचा सविस्तर खुलासा करून घेणे अधिक आवश्यक आहे. ह्या गुरुतत्वात सकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहार करण्याची योग्य दिशा प्राप्त होत असते. ज्यायोगे सर्वत्र सकारात्मक वातावरणाची निर्मिती होत राहते. अध्यात्म तीन पैलूंनी बनलेले आहे; नातेसंबंध, मूल्ये आणि जीवनाचा उद्देश हे होत. अध्यात्मात भावना, संवेदना किंवा असा विश्वास आहे की, माझ्यापेक्षा काहीतरी मोठे आहे, संवेदनात्मक अनुभवापेक्षा मानव असण्यापेक्षा काहीतरी अधिक आहे आणि ज्याचा आपण भाग आहोत. त्यामागचे कारण, तो वैश्विक किंवा दैवी निसर्ग हे आहे. अध्यात्म आपल्या चांगल्या भविष्यासाठी आपला दृष्टीकोन मजबूत करते. जीवनात आपल्याला नेहमीच आव्हानांचा सामना करावा लागतो, परंतु त्या कठीण काळात आपण आशावादी राहिलो तर आपण निश्चितच सक्षम होऊ शकतो. आपण प्रत्येकाने आपल्या आध्यात्मिक गरजा समजून घेतल्या पाहिजेत. आध्यात्म हा मानसिक आणि शारीरिक उपचारांचा अविभाज्य घटक आहे. अध्यात्म संकट समयी अंतर्गत शक्तीचा स्त्रोत असल्याचे आपण जाणून घेतले पाहिजे. ते आपल्या कल्याणाच्या केंद्रस्थानी असून आपल्या जीवनातील सर्व पैलूना समृद्ध करते. शारीरिक, मानसिक, भावनिक आणि नातेसंबंध दृढ करण्यास उपयुक्त ठरते. आपल्या कौटुंबिक गरजांसाठी व्यावहारिक, समजूतदार आणि शांत दृष्टिकोनाला प्रोत्साहन देते. आपल्या अंतःप्रेरणेवर आत्मविश्वास देते आणि यशाकडे जाण्यासाठी आवश्यक ती शक्ती प्रदान करते. आध्यात्मिक तंदुरुस्ती, उद्देश निर्माण करण्यासाठी एक महत्त्वाची पायरी म्हणजे स्व-मूल्यांकन करणे होय. आपल्या जीवनाचे सात परिमाण समृद्ध करण्यासाठी वैयक्तिक योजना करण्याची गरज असते. आपले मन, शरीर, आत्मा, प्रेम, कार्य, खेळ, जग ह्याचा त्याच्याशी थेट संबंध असतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**संसाराचा गेला | शिण-भाग ||**
घुळघुळे टाळ | कीण कीणे वीणा ||
सापडल्या खुणा | अंतरीच्या ||१||
दीनकरा घरी | लावू कैसा दीप ||
गंधाळला धुप | चराचरी ||२||
ज्ञानगंगा होते | माय इंद्रायणी ||
बोले परावाणी | ज्ञाना-तुका ||३||
ओवीत सापडे | अभंगाचा सूर ||
अद्वैताचा पूर | चंद्रभागी ||४||
अंतरीचा दीप | नामाने चेतला ||
आत स्थिरावला | स्थितप्रज्ञ ||५||
निश्चिंतीने आता | जीव सुखावला ||
संसाराचा गेला | शीण-भाग ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी


**स्वाहा स्वधा तथा स्वस्तिस्त्वमेव**
**हि त्वमेव हि | तापत्रयविनाशाय दुर्गां देवीं**
**नमाम्यहम् || २० ||**
**तूच स्वाहा आहेस, स्वधा आहेस, स्वस्ति आहेस. अशा तुला दुर्गा देवीला तीनही तापांच्या शांतीसाठी मी नमन करतो.**



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !


**वाजीगर अहि संग रचे,**
**व्यापक वीष न सोय ।**
**युक्ति भेद विज्ञान का, त्यों गृहस्थ जन**
**होय ।।०७।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल दशम**
**अध्याय) ०४/१०/०७**
**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
गारुडी सापाबरोबर राहातो पण त्याला विषबाधा होत नाही. सापाचे विष उतरविण्याच्या वनस्पतीचे त्याला ज्ञान असते. तद्वतच ब्रम्हविद्येची विज्ञान-भेद युक्ती जाणणाऱ्या गृहस्थाश्रमी संताला माया स्पर्श करत नाही. मायेचं विष शांत करणारी योग-युक्ती संतजनांना माहित असते.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.**

## काव्य-चरितावली



पुष्प ३१वे

आधुनिक केसरी

**श्रीमहाराज म्हणाले मग जिजीला**
**झाले गेले ते तू आता विसरुनी जा,**
**कर सुरुवात तू नामस्मरणाला**
**प्रभूश्रीराम करिती कल्याणाला ।।**
**जिजीच्या आग्रहाने बागेतून आले**
**श्रीमहाराज इनामदारांच्या घरी**
**व्यवस्था ठेवली त्यांची राजापरी**
**गर्दी भक्तांची तिथे होऊ लागली खरी ।।१ ।।**
**श्रीमहाराजांचे घेण्या दर्शन शोधत**
**एक बैरागी फार दुरुनी इंदुरीआला**
**लहान ताईंच्या सोबत श्रीमहाराज**
**खेळताना पाहून तो निराश झाला ।।२ ।।**
**चूक माणसाकडे पाठवले गुरूंनी",**
**स्वतःवर चिडून माघारी निघाला**
**बैरागी जाणून घेतला महाराजांनी**
**ताईकडून त्यास ध्यान- बोध केला ।।३ ।।**
**अधिकार त्यांचा बैराग्यास कळला**
**क्षमा करा महाराज ",उलगडा झाला**
**श्रीमहाराजानी बैरागी उपकृत केला**
**इंदूरच्या मुक्काम त्यांनी हलविला ।।४ ।।**
**म्हणे कवी अरुणदास-लेखनास मला**
**श्रीमहाराजांचा कृपाप्रसाद लाभला ।।**




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

## फक्त 'रामराम ' म्हणत तुझ्या मांडीवर मला जाऊ दे

आधुनिक केसरी

आयुष्यात अनेक कष्ट सोसल्याने गीताबाई आता खूप थकल्या होत्या. श्री आईची अगदी मनापासून सेवा करीत. एके दिवशी रात्री श्री आईचे पाय चेपीत बसले असता ते तिला म्हणाले, "आई, तू आता म्हातारी झालीस, तुझी काही इच्छा असली तर सांग. मी खात्रीने ती पूर्ण करीत." हे ऐकून आईच्या डोळ्यांत पाणी आले आणि म्हणाली, "गणू, माझे आता काय राहिले आहे ? तुझे हे वागणे आणि लोकांचे तुझ्यावरचे प्रेम पाहून मन तृप्त झाले, माझा देह थकत चालला आहे, मनात येते की, एकदा काशीयात्रा घडावी, गंगास्नान करून विश्वेश्वराचे दर्शन घेतले म्हणजे देहाचे सार्थक होईल." आईचे हे बोलणे ऐकून श्री म्हणाले, "वा ! फारच उत्तम. मग उद्याच आपण निघायचे का ? तुला काशीयात्रा घडवण्याचे माझ्याकडे लागले." त्यावर आई म्हणाली, "अरे, पण आपण यात्रेला गेलो तर आपल्या घराकडे कोण पाहील ? घराचा वासादेखील कोणी इथे शिल्लक ठेवणार नाही." त्यावर श्री म्हणाले, "आई, त्याची तू काळजी करू नकोस, मी सर्व व्यवस्था करतो." आईला असे आश्वासन देऊन श्रींनी काशीयात्रेची सर्व तयारी केली. श्रींच्या पत्नीची बरोबर येण्याची इच्छा होती, पण आपण पुढे केव्हातरी खात्रीने जाऊ अशी तिची समजूत घालून त्यांनी तिला माहेरी धाडून दिले. गीताबाई काशीयात्रेस जाणार म्हणून प्रत्येकाला कौतुक वाटत होते. गावचे सर्व लोक निरोप देण्यास जमा झाले. शेवटी श्री आईला घेऊन रामरायाच्या दर्शनाला आले. रामाचा निरोप घेऊन दोघेजण बाहेर आले. तेव्हा गीताबाई म्हणाल्या, "घराकडे लक्ष असू द्या, बरं का, यात्रा संपवून मी लवकर परत येते." त्यावर श्री म्हणाले, "आई, तू तर थकली आहेस, कोणास ठाऊक काळ कसा येईल ? घराचा लोक कशाला ठेवतेस ? आपण त्याची वाट लावू " असे म्हणून श्रींनी चिंतुबुवांना बोलावून घेतले. आपल्या घरावर तुळशीपत्र ठेवले. चिंतुबुवांना मंत्र म्हणायला सांगून सर्वांच्या नावाने पाणी सोडले. 'जमलेल्या लोकांपैकी ज्याला जी वस्तु पाहिजे ती घेऊन जावी ', असे म्हणायचा अवकाश, पंधरा मिनिटांत घर धुतल्याप्रमाणे स्वच्छ झाले. त्यावर श्री आईला म्हणाले, "तुझे लक्ष अडकायला आता मागे काही शिल्लक राहिले नाही, चल आता." हे सर्व पाहून आई म्हणाली, "गणू, मला वाटळे होते की, तुला प्रापंचिक शहाणपण आले, पण नाही रे नाही, तू होतास तसाच बैरागी आहेस. कोणच्या वेळी काय करशील याचा नेम नाही." श्री आईला घेऊन प्रथन नाशिकला आहे, रामाचे दर्शन घेऊन पुढे प्रयागला गेले. तेथे आईला त्रिवेणी संगमामध्ये स्नान घातले व वेणीमाधवाच्या चरणी घालून अक्षयवट दाखविला. तिच्या हातून पुष्कळ दानधर्म करविला. तीन रात्री तेथे राहून सर्वजण काशीला आले. स्टेशनवर श्रींना उतरवून घेण्यास श्रींचा मसुरियादीन शिवमंगल नावाचा श्रीमंत पंडा आला होता. श्रींचा मुक्काम भोसल्यांच्या गंगामहालमध्ये एखाद्या संस्थानिकाप्रमाणे झाला. श्री आईला घेऊन तेथे महिनाभर राहिले. श्री स्वतः आईला गंगास्नानासाठी उचलून घेऊन जात व नंतर विश्वेश्वराच्या दर्शनाला नेत. वाटेतल्या सर्व भिकाऱ्यांना ती दान देई. आईच्या हाताने वस्त्रे व पैसा किती दान दिला याला तर गणतीच नाही. श्री काशीस असताना श्रींना आत्मानंद सरस्वती यांच्यासारखे अनेक विद्वान, साधनी संन्यासी भेटायला येत. तसेच बाबू भट नावाचे दशग्रंथी, हिंदी व संस्कृत भाषेचे जाणकार श्रींना भेटले. १२ वर्षे मौन धरून १३ कोटी रामनामाचा संकल्प पूर्ण करणारे शांताश्रम स्वामी यांचाही श्रींशी खूप संबंध आला. काशीला महिनाभर राहून श्री गयेला गेले. तेथे पिंडदान करून सर्व मंडळी अयोध्येला आली. तेथे आल्यावर गीताबाईंना खूप थकवा वाटू लागला. शक्ती क्षीण होऊ लागली. औषध घेण्यास तिने संमती दिली नाही. खाणे बंद होऊन त्या दुधावर राहू लागल्या. श्री त्यांच्याबरोबर सतत बसून सेवा करीत होते. शरयूमध्ये स्नान करून रामरायाचे दर्शन घेतले. श्रींनी तिला घाटावर गादी घालून बसविले व तिच्या हातून खूप दानधर्म करविला. "गादीखाली खूप पैसे ठेवले आहेत, वाटेल तेवढे तू दे." असे श्री म्हणाले. आईने मनसोक्त दान केल्यावर श्रींनी रामरायाला नैवेद्य करून गावजेवण घातले. आईला विचारले, "तुझी आणखी काही इच्छा शिल्लक आहे का ?" आई म्हणाली, "मुळीच नाही. फक्त 'रामराम ' म्हणत तुझ्या मांडीवर मला जाऊ दे." दुसरे दिवशी श्रींच्या मांडीवर सकाळी गीताबाईनी शांतपणे 'रामराम ' म्हणत देह ठेवला व आपल्या जीवाचे कल्याण करून घेतले.



## तुकाराम गाथा


आधुनिक केसरी

**साकरेसि म्हणतां धोंडा । तरी कां तोंडा न रुचे ॥२॥**
**तुका म्हणे आरुष बोल । नव्हे फोल आहाच ॥३॥ चित्तीं नाहीं तें**
**जवळीं असोनि काय । वत्स सांडी माय तेणें न्यायें ॥१॥**


# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरुवार, १५ जून २०२३



ध्यान धरिता निवृत्ती ।
आनंदमय राहे वृत्ती ।।
पान ६


दुर्गम रस्त्यांचा
सुगम प्रदेश
पान ७


# कधी येणार गा पाऊस...? मान्सून लांबल्याने चिंता वाढली

## मानवी चुकांवर बोट ठेवत आधुनिक केसरी जनचर्चेत प्रतिक्रिया



आधुनिक केसरी

**छत्रपती संभाजीनगर : मृग नक्षत्राचा पहिला दिवस कोरडाच गेला. यंदा मान्सून लांबत चालल्याने मानवाप्रमाणे पशुपक्ष्यांची घालमेल वाढत चाललेली आहे. मानवाच्या असंख्य चुकामुळे निसर्गाचा लहरीपणा निसर्गाच्याच मुळावर उठला काय? अशी म्हणण्याची वेळ आली आहे. तरीही कधी येणार गा पाऊस...? ही चिंता मनामनात काहूर माजवणारी आहे. ऋतूचक्र उलटे फिरतेय आपण वेळीच जागे व्हावे लागेल यासह महत्त्वपूर्ण अशा अस्वस्थ प्रतिक्रिया वाचकांनी आधुनिक केसरी जनचर्चेत मांडल्या.**

आधुनिक केसरी जनचर्चा

### माणसाने निसर्गावर कुरघोडी करू नये...



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

पाणी म्हणजे जीवन असे म्हटले जाते. पाणी आहे तर सर्व अलबेल. घरातही पाण्याशिवाय काहीच करू शकत नाही. घरात पाणी असेल तरच सर्व काही सुख शांती असते. परंतु उन्हाळ्यात पाण्यामुळे माणसांचे जीवन विस्कळीत होते. काही ग्रामीण भागात तर पाणी नसल्याने सर्वसामान्यांना एक हंडाभर पाण्यासाठी कोसो दूर पायी प्रवास करावा लागतो. अनेक ठिकाणी टँकरने पाणी पुरवावे लागते. यामध्येही माणूस विषमता करतो. गरिबांकडे दुर्लक्ष करतो व त्यांच्या त्यांच्या भागात माणसांना पाणी देतो. त्यामुळे सामान्यांचे फार बेहाल होतात. माणूस स्वार्थासाठी निसर्गाचीही मोडतोड करायला लागतो. वृक्ष लागवड करण्याऐवजी वृक्ष तोडण्यावर भर असतो. पाऊस पडण्यासाठी जे वातावरण असायला हवे ते वातावरण माणूस संपून टाकत चालला आहे. "झाडे लावा झाडे जगवा" हे फक्त कागदावरच राहत आहे. जिकडे झाडे तिकडे जास्त पाऊस पडताना दिसतो आहे. ज्या भागात झाडे कमी तिकडे पाऊसही पडतो. रस्त्याच्या कामामुळे ही झाडांची प्रचंड मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करण्यात आली. त्यामुळे पाऊस वेळेवर पडत नाही. जनावरांनाही पिण्यासाठी पाणी मिळत नाही. हिंस्र पशु, पक्षीदेखील पाण्याच्या शोधासाठी माणसांच्या वस्तीत येत आहेत. शेतकरीही हवालदीक होताना दिसत आहे. पाऊस न पडल्यामुळे शेतकरीदेखील चिंतेत राहतो. त्यामुळे माणसाने निसर्गाचा समतोल राखणे महत्त्वाचे आहे.

### कृषी क्षेत्रावर चिंतेचे ढग...!



वसंत राठोड,
संपर्क क्र. : 9892401089

बालपणी जेव्हा हे निसर्ग समजण्याच्या कक्षेत होते तेव्हा मृग नक्षत्र सुरू झाले की, शेतात पेरणीला सुरुवात व्हायची. जून महिन्याच्या शेवटी शेवटी सगळीकडे कसं हिरवागार गालिचा अंथरलेला असायचा. आल्हाददायी वातावरणाचे हिंदोळे देत देत श्रावणमास सुरू होऊन मन एकप्रकारे उल्हासित व्हायचे. 'श्रावण मासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे, क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरुनी उन पडे' बालकवी (त्र्यंबक बापुजी ठोंबरे) यांची कविता तेव्हा बालमनावर सतत रुंजी घालत असत. नैसर्गिक क्रम बदलत गेले आणि आज अवकाळीत रूपांतर झाले. खरोखर निसर्ग बदलला की, मानव बदलला ?निसर्ग बदलला तर त्याचे विपरीत परिणाम पृथ्वीतलावर विध्वंसक या रूपाने होत असतो. निसर्गाच्या सान्निध्यात राहून मानवनिर्मित हस्तक्षेप झाला तर त्याचे परिणाम आपण आज घडीला अनुभवतोय. वृक्ष संवर्धन व संगोपन आपल्याच चुकामुळे लयास गेले. काँक्रिट जग उभारून जागतिक तापमान वाढ या भयंकर अशा संकटाला सामोरे जात आहोत . वाट बिकट आहे, चाहूल लागली आहे. वेळीच सावध व्हावे लागेल. नाहीतर... येरे घना, येरे घना, न्हाऊ घाल माझ्या मना ह्या काव्यपंक्ती कायम विस्मृतीत जातील. ह्या बदलाचा फटका बळीराजाला एकंदरीत कृषिक्षेत्राला बसतोय हे आवर्जून सांगावेसे वाटते.

### वृक्षसंवर्धन करा हो....



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. : 7588565576


उभ्या पिकांवर अन हिरव्या स्वप्नावर पडल्यापेक्षा कधीतरी नांगरून ठेवलेल्या जमिनीवर पड.... अस पावसाला म्हणण्याची वेळ आज आली आहे. उन्हाळ्यात लग्न काढताना पावसाने हाल होतील का ? असा विचार करायला भाग पडणे आणि पावसाळ्यात मात्र कोरडया आभाळाखाली अस्वस्थ होणे. हा अतिशय लहरी वृत्तीचा निसर्ग आपण अनुभवत आहोत. ह्या परिस्थिती ला सर्वस्वी मानव जबाबदार आहे हे वेगळे सांगायची गरज नाही. शहरीकरण आणि रस्त्याचे रुंदीकरण ह्यासाठी झालेल्या झाडाच्या कत्तली पहिल्या की कापून टाकलेल्या झाडांची खोड अस्वस्थ करतात. निसर्गाला हवे तसे ओरबडून स्वतःच्या आवाक्यात आणण्याचा प्रयत्न तर आपण करू शकतो मात्र निसर्ग कोणालाच देव होऊ देत नाही. आपण सर्वांच्या पेक्षा श्रेष्ठ असून आपल्या लहरीपुढे कोणाचे काही चालत नाही हे निसर्गाने वेळोवेळी सिद्ध केले आहे. सलग दोन वर्षे ज्या पंजाबराव डख ह्यांचे अंदाज अचूक येत होते त्यांचेही अंदाज हा लहरी निसर्ग खोटे पाडत आहे. अश्यावेळी पाऊस कधी येईल असा प्रश्न उभा राहतोच. मात्र त्याचे थातुरमातुर उत्तर देऊन वेळ निघून जाईल. पण अश्यावेळी जिथे जागा सापडेल तिथे झाड लावू , डोंगरावर, मोकळ्या जागी घरात खाल्लेल्या फळांच्या बिया लावू असा विचार करून वृक्ष संवर्धन नव्हे तर जंगल संवर्धन करणे गरजेचे आहे असे मला वाटते.

### ऋतूचक्र उलटे फिरतेय...



बाबुराव पाटील
भोकर जि. नांदेड

पाऊस हे सृष्टीचे लेणे असल्याने निसर्ग सौंदर्य अधिक खुलून दिसते. बळीराजाला मृगधारेची आस लागली आहे. आजकाल निसर्ग लहरी बनल्याने ऋतूचक्र उलटे फिरत आहे. मृगनक्षत्र सुरु झाले तरी ती मृगधारा बरसण्यास तयार नाही. पाऊस रुष्ट झाल्याने बळीराजाचे स्वप्न होरपळून जाण्याची भीती आहे. तहानलेल्या, आसुसलेल्या डोळ्यात जीवनाचा मेघ होऊन तो प्रगट व्हावा अशी आशा असताना त्याने घोर निराशा केली आहे. वर्षा ऋतूचा सोहळा रंगावा असे चित्र धुसर होण्याची भीती आहे. बरसावा या शिवारी मेघ सावळा काजळा... ही चिंता शेतकऱ्याना सतावते आहे. रोहिणी नक्षत्र कोरडेच गेल्याने आता मृग नक्षत्र सुरु होऊन आठवडा उलटल्याने पावसाचा थांगपत्ता नाही हे अस्वस्थ करणारे आहे.



### निसर्ग जाणिव ठेवावीच लागणार...



- सौ सीमा देशमुख
अमरावती

खरंतर !कसा येईल पाऊस ? हा प्रश्न मानवाने स्वतःलाच विचारायला हवा. कारण माणूस जसा लहरी वागतो, आपली मनमानी करतो, त्यामुळे निसर्ग देखील लहरी झाला आहे. माणूस जसे निसर्गाचे नियम पाळत नाही, गेल्या काही वर्षांपासून निसर्ग देखील आता मानवाला उत्तर द्यायला लागला आहे. अवकाळी येणारा पाऊस, गारपीट, ढगफुटी, उष्माघात, वाढतं तापमान. हे सर्व निसर्गाचं बिघडलेल्या संतुलनाची लक्षणे आहे. ही ग्लोबल वॉर्निंग आहे. या सर्वात गरीब शेतकरी मात्र पिळवटला जातो. आज जून महिना लागून 14 -15 दिवस उलटून गेले. सर्वजण आज पावसाची आतुरतेने वाट पाहत आहे. पण अजून पाऊस आलेला नाही. याला जबाबदार आपणच आहोत ना! अमाप होणारी वृक्षतोड, सर्वत्र सिमेंट काँक्रीटची जंगलं, प्रदूषण यामुळे गेल्या काही वर्षांपासून निसर्ग लहरी झाला आहे. त्यामुळे पावसाची वाट पाहणे एवढेच आपल्या हातात आहे.

# पश्चिम बंगाल सरकारने घुसखोर रोहिंग्यांना दिला मुस्लिम ओबीसींचा दर्जा : प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ

आधुनिक केसरी न्यूज




**मुंबई :** पश्चिम बंगालमधील ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने बांगला देशमधील भाटिया मुस्लिम आणि रोहिंग्यांना मुस्लिम ओबीसींचा दर्जा दिल्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो, असे प्रतिपादन भाजपा महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी बुधवारी केले. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. प्रदेश प्रवक्ते शिवराय कुलकर्णी आणि महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष वर्षा भोसले यावेळी उपस्थित होते. रोहिंग्यांना आरक्षण देऊन ममता बॅनर्जींना दहशतवादाला उत्तेजन द्यावयाचे आहे का, असा सवालही त्यांनी केला.

श्रीमती चित्रा वाघ यांनी सांगितले की राष्ट्रीय मागास आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांनी अलिकडेच पश्चिम बंगाल, बिहार राजस्थान आणि पंजाब या चार राज्यांचा दौरा केला. या दौऱ्यात अहिर यांना अनेक धक्कादायक गोष्टी आढळून आल्या. पश्चिम बंगालमध्ये २०११ पर्यंत हिंदु अन्य मागासवर्गीयांच्या (ओबीसी) ५५ जाती होत्या. तर मुस्लिम ओबीसींच्या ५३ जाती होत्या. २०२३ मध्ये या प्रमाणात मोठे बदल होऊन प. बंगालमध्ये एकूण ओबीसींच्या जाती १७९ असून त्यापैकी मुस्लिम ओबीसींच्या ११८ जाती तर हिंदु ओबीसींच्या ६१ जाती असल्याचे दिसून आले आहे. म्हणजे गेल्या १२ वर्षात मुस्लिम ओबीसींच्या जाती ५३ वरून ११८ तर हिंदु ओबीसींच्या जाती ५५ वरून अवघ्या सहाने वाढून ६१ झाल्या. पश्चिम बंगाल सरकारने मुस्लिमांमधील ज्या जातींना ओबीसींचा दर्जा दिला आहे. त्यामध्ये बांगला देशातील भाटिया मुस्लिम आणि रोहिंग्यांचा समावेश असल्याचे राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाला आढळून आले आहे. राष्ट्रीय आयोगाने याबाबत राज्य मागासवर्गीय आयोगाकडे विचारणा केली होती. पश्चिम बंगालमध्ये अनधिकृतपणे वास्तव्य करणारे रोहिंगे मुस्लिम आणि बांगला देशमधील भाटिया मुस्लिम यांना ओबीसीचा दर्जा देताना राज्य शासनाच्या संबंधीत यंत्रणेने (कल्चरल रिसर्च इन्स्टिट्यूट) आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया पार पाडली नसल्याचे दिसून आले, असेही श्रीमती वाघ यांनी नमूद केले. रोहिंग्यांचा राष्ट्रीय सुरक्षेला धोका असल्याचे यापूर्वी अनेकदा दिसले आहे. अशा घुसखोरांना ओबीसींचा दर्जा देण्याचे पाप ममता सरकारने केल्याचे त्यांनी सांगितले.




## भाजप-अद्रमुकमध्ये तणाव

आधुनिक केसरी

मिळनाडूमध्ये अण्णा द्रमुक-भाजप युतीमध्ये तणाव निर्माण झाला आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष अण्णामलाई यांनी दिवंगत मुख्यमंत्री जे. जयललिता यांच्याबाबत केलेल्या कथित वक्तव्यावरून हा वाद निर्माण झाला आहे.अण्णा द्रमुकचे सरचिटणीस के. पलानिस्वामी म्हणाले, की भाजपच्या प्रदेशाध्यक्षांनी जयललितांवर केलेल्या टीकेमागे त्यांचा अंतस्थ हेतू वेगळाच आहे. त्यात राजकीय अप्रगल्भता आणि बेजबाबदारपणा दिसतो. या संदर्भात आमच्या पक्षाच्या जिल्हाध्यक्षांनी भाजप प्रदेशाध्यक्षांविरोधात ठराव केला आहे. अण्णा द्रमुकने के. अण्णामलाई यांना टीकेचे लक्ष्य केल्यानंतर अण्णामलाई पुन्हा आक्रमक झाले. तमिळनाडूच्या राजकारणात भ्रष्टाचार ही प्रमुख समस्या आहे, असे त्यांनी म्हटले आहे.अण्णा द्रमुकच्या जिल्हाध्यक्षांच्या बैठकीत अण्णामलाई यांच्या निषेधाचा ठराव मंजूर झाल्यानंतर काही वेळातच अण्णामलाई म्हणाले की, मी तमिळनाडूतील लोक आणि भाजप कार्यकर्त्यांना सांगू इच्छितो की, भ्रष्टाचार हा या राज्यात मोठा प्रश्न आहे. गेली अनेक वर्षे लोककल्याणाच्या अनेक योजना राजकीय नेत्यांनी स्वाहा केल्या. भ्रष्टाचारामुळे राज्याची अपकिर्ती झाली आहे. दरम्यान, अण्णा द्रमुकने अण्णामलाई यांच्या निषेधार्थ केलेल्या ठरावात म्हटले आहे की, माजी मुख्यमंत्री व विद्यमान विरोधी पक्षनेते के. पलानिस्वामी यांच्यामुळेच राज्याच्या विधिमंडळात २० वर्षांनी भाजपचे चार आमदार निवडून येऊ शकले.अण्णामलाई यांनी आपले तोंड आवरले नाही, तर भाजपबरोबरची युती मोडावी, अशी भूमिका सोमवारी माजी मंत्री डी. जयकुमार यांनी मांडली होती. सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) तमिळनाडूचे विद्युतमंत्री व्ही सेंथिल बालाजी आणि अन्य काही जणांच्या आस्थापनांवर मंगळवारी छापे टाकले. आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात ही कारवाई करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने गेल्या महिन्यात बालाजी यांच्याविरोधात नोकऱ्यांसाठी रोख रक्कम घेण्याच्या प्रकरणी पोलीस आणि ईडी चौकशीला परवानगी दिली होती. गेल्याच महिन्यात आयकर विभागानेही बालाजी यांच्या निकटवर्तीयांच्या आस्थापनांवर छापे टाकले होते.



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

## वृद्धाश्रमात आईबाप: हेच खरे महापाप !

आधुनिक केसरी

**ज्येष्ठांचे जुने रितीरिवाज, साधे राहणीमान, कृश शरीरयष्टी, खांकरणे-शिंकणे, आदी गोष्टी आपल्या टुमदार टोलेजंग इमारतीत शोभत नाहीत, त्यांची लाज वाटते म्हणून सून आणि मूलगा मिळून छळ करत असतील, त्यांना आपल्या घरांपासून लांब, वृद्धाश्रमात फुकटची सोय उपलब्ध असून तीचा लाभ उठवावा व आपली बचत व्हावी, अशा स्वार्थापोटी धाडत असतील. तर ज्येष्ठांना इच्छा नसतानाही निमुटपणे हे सारे सोसावे लागत आहे. अशावेळी त्यांना मदत होऊ शकेल, असा कायदा सन २००७मध्ये झाला. परंतु त्याची माहिती अनेकांना आजही नाही. हेल्प एज इंडिया ही संस्था या कायद्याविषयी जागृती निर्माण करत आहे.**

वैद्यकीय शास्त्रातील संशोधनामुळे असाध्य रोगांवर उपचार उपलब्ध झाले आहेत. त्यामुळे माणसाचे एकूणच आयुर्मान वाढले आहे. अर्थातच याचा परिणाम ज्येष्ठ नागरिकांच्या लोकसंख्येवरही झाला आहे. आज भारतातच ज्येष्ठ नागरिक- ६० वर्षं किंवा त्यापेक्षा जास्त वय असणाऱ्यांची संख्या जवळपास ११.५० कोटी आहे. त्यामध्ये ५३ टक्के महिला आहेत. तर ९० टक्के ज्येष्ठ नागरिकांना पेन्शन नाही आणि ४० टक्के ज्येष्ठ नागरिक एकटे राहतात. ज्येष्ठ नागरिकांच्या या वाढत्या लोकसंख्येमुळे व त्यांना भेडसावत असलेल्या समस्यांमुळेच ते हैराण आहेत. त्यांच्यासंबंधाने समाजात जनजागृती व्हावी, या उद्देशाने युनायटेड नेशन- युएनने १ ऑक्टोबर हा जागतिक ज्येष्ठ नागरिक दिवस व १५ जून हा जागतिक ज्येष्ठ नागरिक छळ प्रतिबंध जागृती दिवस म्हणून जाहीर केला आहे. हे सगळे लक्षात घेऊनच ज्येष्ठांचा होणारा छळ व त्यांच्यावर होणारा अत्याचार याबद्दल हेल्प एज इंडियातर्फे गेली ६ वर्षे भारतात सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणातून हे लक्षात आले आहे की मुलगा व सून यांच्याकडून ज्येष्ठ नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर छळ होत आहे. यामध्ये शाब्दिक, आर्थिक, शारीरिक छळ अशा सर्व प्रकारच्या छळांचा समावेश आहे. छळ करण्याचे प्रमुख कारण म्हणजे- संपत्ती होय. मात्र अशा कोणत्याही प्रकारे मुलगा-मुलगी किंवा जावई-सून यांच्याकडून ज्येष्ठ नागरिकांचा छळ होत असेल आणि त्यांच्याकडून कुठलीही आर्थिक मदत ज्येष्ठ नागरिकांना होत नसेल, तर ज्येष्ठ नागरिकांना मदत करण्यासाठी कायदा आहे. तो म्हणजे आई-वडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी नियम २००७ हा होय. परंतु या कायद्याची माहिती बऱ्याच ज्येष्ठ नागरिकांना, युवा पिढीला व पोलिस खात्यात काम करीत असलेल्या व्यक्तींनाही नाही. म्हणूनच हेल्प एज इंडियातर्फे सध्या या कायद्याविषयी जागृती निर्माण केली जात आहे. ज्येष्ठ नागरिकांचा मुलांकडून छळ होत असेल, त्यांची मालमत्ता मुलांनी बळकावून घेतली असेल किंवा त्यांना मुलांकडून कुठलीही आर्थिक मदत मिळत नसेल, तर या कायद्याद्वारे ज्येष्ठ नागरिकांना मदत मिळू शकते. यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी कार्यालयात न्यायाधिकरण स्थापित करण्यात आले आहे. या कायद्यांतर्गत ज्येष्ठ नागरिकांना निर्वाह खर्चासाठी मुलांकडून दरमहा रुपये पाच हजार मिळू शकतात. निर्वाह खर्चाची रक्कम न दिल्यास मुलांना दंड म्हणून रुपये पंधरा हजार किंवा ३ महिने तुरुंगवास या कायद्यांतर्गत होऊ शकतो. प्रॉपर्टी बळकावून मुलांतर्फे ज्येष्ठ नागरिकांना त्रास होत असेल, तर या कायद्यामुळे ज्येष्ठांना मदत मिळू शकते.



विशेष म्हणजे हा कायदा संपूर्ण भारतात लागू आहे. वृद्धांवर पुढीलप्रमाणे अत्याचार केले जातात- शारीरिक छळ, मानसिक-भावनिक छळ- यात शिवीगाळ होण्याचाही अंतर्भाव होतो, आर्थिक स्वरूपाचे व वस्तूंशी निगडित शोषण, दुर्लक्ष, लैंगिक छळ, वृद्ध व्यक्तींचा त्याग करणे, ज्येष्ठांनीच स्वतःकडे दुर्लक्ष करणे अशा आदी गोष्टींचा समावेश होतो. हे अत्याचार गरीब, मध्यम वर्गीय, श्रीमंत, सुशिक्षित, अशिक्षित, कोणत्याही धर्म-जातींत घडू शकतात व घडत असतात. अनेकदा तीर्थक्षेत्री, मोठ्या शहरांमध्ये अगर वृद्धाश्रमांमध्ये वृद्धांना सरळ सोडून दिले जाते किंवा त्यांच्याशी असलेला सर्व संपर्क तोडण्यात येतो. त्यांना घराबाहेर हाकलले जाते किंवा अडगळीच्या जागेत डांबले जाते. शहरांत-खेड्यांत सर्रास आढळणारे हे प्रकार आहेत. ज्येष्ठ नागरिकांचा छळ म्हणजे उजेडात न आलेले कटू सत्य होय. याचे कारण म्हणजे ज्येष्ठ नागरिक याची वाच्यता करत नाहीत. सर्व त्रास ते गुपचूप सहन करतात. आपल्याच व्यक्तीकडून त्रास झाल्यावर कोणाला सांगायचे, त्यांना हे कळत नाही. सांगितले, तर पाहिजे ती मदत मिळत नाही, उलट त्रास वाढण्याची शक्यता अधिक असते. गेल्या काही वर्षांपासून जनजागृती वाढल्याने बरेच ज्येष्ठ आता पुढे येऊन बोलत आहेत. हेल्प एज इंडियाद्वारे ज्येष्ठ नागरिकांसाठी हेल्पलाइन सुरू करण्यात आली आहे. त्यावर दररोज ११ ते १४ कॉल्स येतात. त्यात ५० ते ६० टक्के कॉल्स हे ज्येष्ठ नागरिकांचा छळ वा त्रास यासंबंधी असतात. संबंधित कार्यालयाच्या वतीने ज्येष्ठ नागरिक व त्यांच्या कुटुंबातील सदस्य- जे छळ करतात त्यांची वेगवेगळी भेट घेऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेतले जाते. त्यानंतर या सर्वांची एकत्र भेट घेऊन त्यांना मार्गदर्शन केले जात आहे. आतापर्यंतचा अनुभव असा आहे, की १० पैकी ५ केसेस समजून घेतात व त्यांची समस्या सुटते. जे समजून घेत नाही किंवा ऐकतच नाही, त्या सर्वांना या कायद्याबद्दल सांगितले जाते व न्यायाधिकरणाकडे जाण्यास बजावण्यात येते. तेव्हा लक्षात येते, की बऱ्याच ज्येष्ठ नागरिकांना आणि कुटुंब सदस्यांना या कायद्याची माहिती नाहीय. जे ज्येष्ठ नागरिक आपली फिर्याद न्यायाधिकरणाकडे घेऊन जातात, त्यात बऱ्याच ज्येष्ठांना निर्वाह खर्चासाठी मुलांकडून आर्थिक मदत मिळते, तर काही ज्येष्ठांना त्यांची घरे परत मिळत आहेत. काही ज्येष्ठांना न्यायाधिकरणाकडून निकाल मिळाला तरीही, मुले त्यांचे पालन करत नाहीत. तेव्हा त्यांनी पोलिसांकडे फिर्याद करावी. काहींना पोलिसांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही. कारण पोलिसांनाही या कायद्याचे पूर्ण ज्ञान नाही असे समजावे. न्यायाधिकरणाचा निकाल राबवण्यामध्ये पोलिस यंत्रणेचा सहभाग महत्त्वाचा आहे.

ज्येष्ठ नागरिक व कुटुंबातील सदस्य यांना मार्गदर्शन व समुपदेशन करून त्यांना एकत्र आणण्याचा प्रयत्नही हेल्प एज इंडिया प्रामुख्याने करीत आहे. ही एक सामाजिक संस्था असून गेल्या ४२-४३ वर्षांपासून ज्येष्ठांच्या कल्याणासाठी संपूर्ण भारतात कार्यरत आहे. या कायद्याविषयी जागृती निर्माण करण्यासाठी या संस्थेतर्फे ज्येष्ठ नागरिक संघ, शासकीय-अशासकीय संस्था, कॉलेज, कंपनी- कॉर्पोरेट या ठिकाणी चर्चासत्रांचे आयोजनही करण्यात येते. ज्येष्ठांना मदत करणारा व त्यांना सन्मानाने जगण्यास प्रवृत्त करणारा हा कायदा आहे, त्याचा प्रसार करण्याचा प्रयत्न याद्वारे केला जात आहे, पण तो इतरांनीही केला पाहिजे. कारण एकंदरीत या कायद्याबद्दलची अनभिज्ञता पाहता, त्याबद्दल जनजागृती करणे फारच महत्त्वाचे आहे.



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

## हा स्त्री जन्म निर्माण का झाला ?

आधुनिक केसरी

**'स्त्री' परमेश्वरानं निर्माण केलेली अप्रतिम आणि सुंदर कलाकृती. तिच्याविषयी किती लिहावं आणि किती नको हाही मोठा यक्षप्रश्नच आहे??? तीच आई , तीच पत्नी, तीच बहीण, तीच सखी, तीच मैत्रीण, तीच संसाराचं चाक, तीच अर्धांगिनी आणि तीच सहधर्मचारिणी.... असं असतानाही हा समाज, हि कुटुंबव्यवस्था तिला कोंडमारा करून मारण्याचा प्रयत्न करते, चूल आणि मूल या रिंगणात तिला नाचवते. पूर्वीच्या काळी परिस्थिती बिकट होती, तीच जगण म्हणजे क्षणोक्षणी मरण असायचं, तिला शिक्षणाचा हक्क नव्हता, सतीप्रथा होती, तिला घरात, समाजात कोणतंच स्थान नव्हतं..तिला मान वर करून बघण्याचा देखील अधिकार नव्हता.. त्या पुरुषप्रधान संस्कृतीत तिला एक उपभोगाच साधन यापलीकडे काहीच किंमत नव्हती पर्यायाने ती सुरक्षित नव्हती.**

स्त्री अत्याचाराबाबत, वाचलं, ऐकल तर हा स्त्री जन्म निर्माण झाला, असं वाटतं. महिलांवर होणारे जघन्य गुन्हे हृदय पिळवटून टाकणाऱ्या आहेत. मात्र, महिलांवरील अत्याचाराची समस्या नवीन नाही. भारतीय समाजात महिला दीर्घकाळापासून अवहेलना, अत्याचार आणि शोषणाच्या बळी पडत आहेत. समाजात प्रचलित असलेल्या आपल्या विचारधारा, संस्थात्मक चालीरीती आणि रूढी आणि स्त्रियांकडे समाजाचा बघण्याचा दृष्टीकोन यांनी त्यांच्या दडपशाहीला मोठा हातभार लावला आहे. यापैकी काही व्यावहारिक प्रथा आजही प्रचलित आहेत. आज स्त्रिया एकीकडे यशाचे नवे आयाम निर्माण करत आहेत. मोठे शिखर गाठत आहे... प्रत्येक क्षेत्र स्त्रियांनी पादाक्रांत केले आहे.. प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांनी नावलौकिक मिळविला आहे..असे कोणतेही क्षेत्र आज उरलेले नाही की ज्यात स्त्रियांनी प्रवेश करून आपला लौकिक मिळविला नाही. तर दुसरीकडे अनेक स्त्रिया जघन्य हिंसाचार आणि गुन्हेगारीच्या बळी ठरत आहेत. त्यांना मारहाण केली जाते; त्याचे अपहरण झाले आहे; त्यांच्यावर बलात्कार होतो; ते जाळले जातात किंवा मारले जातात. त्यांचे तुकडे केले जातात.दगडाने ठेचून मारले जातात.. पण आपण कधी विचार करतो का की ज्या महिलांवर अत्याचार होतात त्या कोण आहेत किंवा त्यांच्यावर अत्याचार करणारे लोक कोण आहेत ? हिंसाचाराचे मूळ कारण काय आहे आणि ते कसे दूर करावे ? साहजिकच, आपल्यापैकी बहुतेकजण या प्रश्नांचा खरोखर विचार करत नाहीत. याउलट जेव्हा जेव्हा आपण एखाद्या महिलेवर होणाऱ्या अत्याचाराच्या बातम्या पाहतो किंवा ऐकतो तेव्हा त्या हिंसेविरुद्ध आवाज उठवण्याऐवजी आपण आपल्या घरातील महिला, बहिणी, मुलींवर विविध बंधने लादतो, ही एक प्रकारची हिंसाच आहे. या सर्व कारणांमुळे, महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण कमी होण्या ऐवजी वाढतच आहे. समाजात महिलांना प्राधान्य आणि महिलांची सुरक्षा ही केवळ घोषणा आणि भाषणांपुरती मर्यादित आहे. आजही समाजात महिलांकडे होणाऱ्या दुर्लक्षातून त्यांच्यावरील अत्याचारात फारशी घट झालेली नाही. महिलांच्या सुरक्षेबाबत पोलीस विभागात महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांचीही विशेष नियुक्ती करण्यात येत आहे. महिला पोलिस ठाणे आणि महिला ऊर्जा डेस्क कार्यरत आहेत, कारण महिलांशी संबंधित गुन्ह्यांमध्ये कोणतीही घट होत नाही. महिलांशी संबंधित गुन्हे रोखण्यासाठी पोलीस आपल्या स्तरावर शक्य ते सर्व प्रयत्न करतात, पण ते पुरेसे नाही, कारण पोलीस प्रत्येक वेळी आणि सर्वत्र पोहोचू शकत नाहीत. समाजात महिलांबद्दल आदराची वृत्ती असायला हवी. प्रत्येक व्यक्तीच्या मनात महिलांबद्दल आदर असायला हवा, तरच पोलिस आणि सरकारचा हेतू पूर्ण होईल. शासन स्तरावर केलेले सर्व प्रयत्न चांगले आहेत, पण त्याचे सार्थक परिणाम दिसून येत नाहीत, यामागचे मुख्य कारण म्हणजे समाजातील सुशिक्षित वर्गही महिलांकडे सन्मानाच्या दृष्टिकोनातून पाहत नाही. महिलांशी संबंधित गुन्हे कमी करण्यासाठी किंवा रोखण्यासाठी सरकारी यंत्रणेबरोबरच समाजालाही खांद्याला खांदा लावून उभे राहावे लागेल. तसे झाल्यास अल्पावधीतच बलात्कार, विनयभंग, हुंडाबळी, अल्पवयीन मुलीचे अपहरण अशा गंभीर घटनांमध्ये घट होईल. सध्या केवळ पोलीस स्वतःच्या प्रयत्नाने असे गुन्हे रोखण्याचा प्रयत्न करतात. महिलांशी संबंधित गंभीर गुन्ह्यांबाबत



बोलबलात्कार, विनयभंग, खून, हुंडाबळी, अल्पवयीन मुलींचे अपहरण आदींचा समावेश आहे. गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलीस महिला कर्मचाऱ्यांसह अन्य पोलीस कर्मचाऱ्यांचे सहकार्य घेतात, मात्र समाजात जागरूकता नसल्याने पोलिसांच्या प्रयत्नांना चांगले यश येत नाही. दुसरीकडे महिलांशी संबंधित गुन्ह्यांच्या सुनावणीसाठी पुरेशा महिला पोलीस अधिकारी व कर्मचारीही असल्या तरी समाजाचा महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत नाही तोपर्यंत बदल होणार नाही, असं एकंदरीत म्हणता येईल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या हाती पहिल्यांदाच एकात्मिक पाठ्यपुस्तके

## संपूर्ण विषयासाठी केवळ चार पुस्तके : प्रा. जीवन कोलते

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** विद्यार्थ्यांच्या पाठीवर दप्तराचे ओझे वाढत असल्याने याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या वाढीवर होत असल्याचे शिक्षण विभागाच्या लक्षात आल्यानंतर दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक व संशोधन विभागाकडून एकात्मिक पाठ्यपुस्तक हा उपक्रम हाती घेतला असून सन 2020-21 मध्ये 59 तालुक्यात प्रायोगिक तत्वावर राबवण्यात आला होता यामध्ये प्राप्त झालेल्या यश प्राप्तीनंतर हा उपक्रम आता सर्वत्र राबवला जाणार असल्याने शिक्षण विभागाकडून यावर्षी सर्व विषयाच्या अभ्यासक्रमाचे केवळ एकच पुस्तक विद्यार्थ्यांच्या हाती दिले जाणार आहे. वेगवेगळ्या विषयाचे वेगवेगळे पुस्तक बाळगताना व सांभाळताना विद्यार्थ्यांची मोठी कसरत होत होती यामुळे नाहक विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे मोठ्या प्रमाणावर वाढत होते याबाबत न्यायालयाने देखील शिक्षण विभागाला सूचना दिल्या होत्या अनुषंगाने शिक्षण विभागाने एकात्मिक पाठ्यपुस्तक हा उपक्रम गेल्या वर्षी हाती घेतला होता. या अनुषंगाने यावर्षी संपूर्ण औरंगाबाद जिल्ह्यामध्ये एकात्मिक पाठ्यपुस्तक शिक्षण विभागामार्फत इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत वितरित केले जाणार आहे. पहिली ते आठवीपर्यंतच्या सर्व विषयांसाठी एकाच पुस्तकांमध्ये अभ्यासक्रम घेण्यात आला असून यामध्ये पहिल्या तीन महिन्याचा अभ्यासक्रम या पुस्तकांमध्ये असणार आहे तीन-तीन महिन्याचा अभ्यासक्रम करून एकत्रित चार विभाग या पुस्तकाचे तयार करण्यात आलेले असून संपूर्ण अभ्यासक्रमाचे केवळ चार पुस्तक विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असणार आहे.





विद्यार्थ्यांच्या पाठीवरील ओझे कमी करण्यासाठी शासनाने एकात्मिक पाठ्यपुस्तक हा उपक्रम राबवला असून यावर्षी तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या पाठीवरील ओझे या उपक्रमामुळे नक्कीच कमी होणार आहे एकात्मिक पाठ्यपुस्तक विद्यार्थ्यांसाठी मोठे लाभदायक ठरणार असून शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या हाती हे पुस्तक असणार आहे .

**प्रकाश नाईक गटशिक्षण अधिकारी पंचायत समिती सोयगाव**

खाजगी पुस्तकालयात पाठ्यपुस्तक उपलब्ध नसणा .शिक्षण विभाग कडून एकात्मिक पाठ्यपुस्तक हा उपक्रम सध्या हाती घेण्यात आला असल्याने एकात्मिक पाठ्यपुस्तक केवळ शिक्षण विभागाच्या शाळांमध्ये वितरित केले जाणार असल्याने खाजगी पुस्तकालयात हे एकात्मिक पाठ्यपुस्तक विक्रीसाठी सध्या तरी उपलब्ध नसणार आहे यामुळे विद्यार्थ्यांना सर्वस्वी शिक्षण विभागावर अवलंबून राहावे लागणार आहे .

**प्रा .जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते सावळदबारा ता सोयगाव**

# गडचिरोलीत वाघिणीचा चार बछड्यांसह मुक्तसंचार

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** जिल्ह्यात मागील तीन वर्षात वाघांची संख्या झपाट्याने वाढली आहे. त्यामुळे मानवी वस्तीजवळ किंवा रस्त्यालगत वाघांचा मुक्तसंचार देखील वाढला आहे. सोमवारी संध्याकाळच्या सुमारास देसाईगंज तालुक्यातील उसेगाव- कासवी मार्गावर रस्ता ओलांडताना वाघिणीला चार बछड्यांसह कॅमेऱ्यात टिपण्यात आले. ही चित्रफीत समाजमाध्यमावर सार्वत्रिक झाल्याने चर्चेचा विषय ठरली आहे. ताडोबाची सीमा गडचिरोली जिल्ह्याला लागून असल्यामुळे मागील काही वर्षात वाघांचे मोठ्या प्रमाणात स्थलांतर झाले आहे. परिणामी गडचिरोली जिल्ह्यात वाघांची संख्या वाढली. यामुळे वाघाचे हल्ले देखील वाढले. गडचिरोली आणि देसाईगंज वनविभागात वाघांचे सर्वाधिक प्रमाण आहे. त्यामुळे या क्षेत्रात रस्त्यालगत वाघांचा वावर असतो. सोमवारी संध्याकाळच्या सुमारास उसेगाव-कासवी मार्गावर एक वाघीण आपल्या चार बछड्यांसह रस्ता ओलांडताना मोबाईल कॅमेऱ्यात टिपण्यात आली. या मार्गावरील रहदारी काही काळ थांबली होती. यावेळी अनेकांनी वाघिणीचा मुक्तसंचार कॅमेराबध्द केला.



# अकोल्यात महेश नवमी विविध उपक्रमांनी साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**सतीश पाचपुते**

**अकोले :** माहेश्वरी समाजाचा उत्पत्ती दिन महेश नवमीच्या निमीत्ताने अकोले तालुका माहेश्वरी सभेने रक्तदान, डोळे तपासणी सह ब्लड चेक अप (58 चाचण्या) शिबीराचे आयोजन केले होते. त्यास उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. आरोग्याच्या काळजीसाठी मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेर च्या सहकार्याने आयोजीत केलेल्या ब्लड चेक अप कॅम्पमध्ये 60 व्यक्तिंची तपासणी झाली. शिबीराचे उद्घाटन डॉ.इ म्रान शेख, मार्केटींग मॅनेजर योगेश चौधरी, संतोष गोडसे, सिस्टर हिना लाहोटी, सिस्टर रोहिणी खैरे, तालुकाध्यक्ष विजय सारडा, जिल्हा कोषचे विश्वस्त रामनिवास सारडा, प्रकल्प प्रमुख सतीशकुमार बाहेती, प्रदेश जनसंपर्क मंत्री अजय जाजू, जिल्हा उपाध्यक्ष सोमनाथ रा. मुंदडा व समाज बांधवांच्या उपस्थितीत महेश पुजनाने झाला. यावेळी अकोले तालुका सभेच्या वतीने प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. प्रकल्पाची माहिती देतांना जिल्हा प्रकल्प प्रमुख सतीशकुमार बाहेती म्हणाले कि काळाजी गरज ओळखुन मेडिकव्हर हॉस्पिटलच्या सहकार्याने संपूर्ण अहमदनगर जिल्ह्यात अशा शिबीरांचे आयोजन करण्यात आले. त्यास सर्वत्रच उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. अकोलेकर आरोग्याविषयी सतर्क असल्यामुळेच आज 60 जणांची तपासणी झाली हि उल्लेखनिय बाब आहे. त्याचबरोबर अकोले तालुकाध्यक्ष विजय सारडा व त्यांच्या सहकार्यांनी जिल्हा सभेच्या प्रत्येक आवाहनास प्रतिसाद देत आरोग्यविषयी तिन्ही शिबीरांचे आयोजन केले याबद्दल त्यांचे तसेच मेडिकव्हर टिमचे आभार मानले.




प्रास्तविकात माहेश्वरी समाजाचे तालुकाध्यक्ष विजय सारडा म्हणाले कि सध्याच्या धकाधकीच्या जीवनात आरोग्याची काळजी घेणे नितांत गरजेचे आहे. म्हणून जिल्हा सभेच्या सुचनेनुसार तालुका सभेने रक्त, डोळे तपासणी शिबीराचे आयोजन केले होते. त्यास उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. याकामी जिल्हा प्रकल्प प्रमुख सतीशकुमार बाहेती, प्रदेश जनसंपर्क मंत्री अजय जाजू, जिल्हा उपाध्यक्ष सोमनाथ रा. मुंदडा यांचे विशेष सहकार्य लाभले. याप्रसंगी जिल्हा सभा सदस्य रमेशचंद्र सारडा, गोधाम गोशाळेचे उपाध्यक्ष तथा जिल्हा समाज कल्याण कोष चे ट्रस्टी रामनिवास राठी, मॉडर्न हायस्कुल चे चेअरमन सतीश बुब, अगस्ती देवस्थान चे ट्रस्टी महेश सारडा, ज्येष्ठ मार्गदर्शक विजय बूब, डॉ. प्रकाश सारडा, शुभम मणियार, अनिल भळगट, प्रकाश लोढा, सुरेश लोढा, दिनेश बुब, दिलीप शहा, श्री व सौ. विजय राठी, श्री व सौ. पंकज माहेश्वरी तसेच सौ.निलीमा सारडा, सौ.प्रियतमा सारडा, सौ.स्वाती सारडा, सौ.प्रियंका बुब, सौ.शोभा राठी, सौ.कल्पना राठी, सौ.प्रमिला मुंदडा आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी तालुकाध्यक्ष विजय सारडा, उपाध्यक्ष चेतन बुब, मंत्री विशाल राठी, सहमंत्री आनंद मुंदडा, अर्थमंत्री प्रसाद राठी, संगठन मंत्री निरज मुंदडा आदींनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थितांचे आभार तालुका सचिव विशाल राठी यांनी मानले.



अर्जंट फ्लॅट विकणे आहे

नक्षत्रवाडी येथील गट क्र. 8/1, समर्थ एलक्लेव्हमध्ये पहिल्या मजल्यावरील 2 बीएचके फ्लॅट अर्जंट विकणे आहे. एकूण क्षेत्रफळ 910 स्क्वेअर फूट, क्लिअर टायटल, सीएसएमएसएस कॉलेजपासून पाच ते सात मिनिटांच्या अंतरावर, रम्य वातावरणात, मेन रोडच्या अगदी जवळ,

संपर्क : मो. 7588818406

महाराष्ट्र Business Katta














पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

# ध्यान धरिता निवृत्ती । आनंदमय राहे वृत्ती।।

आधुनिक केसरी

**संत मंडळींसाठी सदा वंदनीय असलेल्या निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई या चारही भावंडांचे आपल्या मराठी भाषेवर अनंत उपकार आहेत. त्यांनी मराठीचे खरे स्वरूप जगास प्रकट केले. त्यांनीच या महाराष्ट्राच्या भाषेच्या पेठेत ब्रह्मविद्येचा सुकाळ करून नवरसांचे समुद्र निर्माण करून आपल्या कौशल्याने संस्कृतालाही जिंकून प्रत्यक्ष साहित्यशास्त्राकरवी मराठीला अलंकाराचे लेणे लेवविले. या भावंडांपैकी जेष्ठ निवृत्तीनाथ हे शंकराचा अवतार असल्याचे संतमंडळी मानतात, तसा उल्लेखही त्यांनी आपल्या ओव्या अभंगातून केलेला आहे. संत जनाबाई म्हणतात... सदाशिवाचा अवतार । स्वामी निवृत्ती दातार ।। महाविष्णूचा अवतार । सखा माझा ज्ञानेश्वर ।। संत कान्हूपात्रानी सुद्धा निवृत्तीनाथ महादेवाचा अंश असल्याचे खालील अभंगातून म्हटले आहे-**

**शिव तो निवृत्ती विष्णू ज्ञानदेव पाही ।**
**सोपान तो ब्रम्हा मूळ माया मुक्ताई।।**

रुक्मिणीबाई आणि विठ्ठलपंत हे निवृत्तीनाथांचे मातापिता, तसेच ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताई ही त्यांची लहान भावंडे. गोरक्षनाथांचे शिष्य गहिनीनाथ हे निवृत्तीनाथांचे गुरू होत. निवृत्तीनाथांची व गहिनीनाथांची भेट ब्रह्मगिरी पर्वताच्या प्रदक्षिणेच्या वाटेवर पडली होती, तिथेच निवृत्तीनाथांना अनुग्रह झाला. निवृत्तीनाथांनी आपल्याला मिळालेला ज्ञानोपदेश ज्ञानेश्वरांना दिला व ते ज्ञानेश्वरांचे गुरू ठरले. हे गुरुगम्य रहस्य आपल्यापर्यंत कसे येऊन पोहचले, हे सांगतांना ज्ञानेश्वर पुढील अभंगात लिहितात..

**आदिनाथ गुरू सकळ सिद्धांचा ।**
**मच्छिंद्र तयांचा मुख्य शिष्य ।।**
**मच्छिंद्राने बोध गोरक्षासी केला ।गोरक्ष वोळला गहिनी प्रति ।।**
**गहिनीप्रसादें निवृत्तिदातार ।ज्ञानदेवा सार चोजविलें ।।**

पुढे एके दिवशी निवृत्तीनाथ ज्ञानेश्वरांना म्हणाले "गीता हा प्रस्थानत्रयीतला महत्त्वाचा ग्रंथ, पण तो संस्कृत भाषेत असल्यामुळे बाळ्या-भोळ्यांना त्याचा आस्वाद घेता येत नाही. त्यासाठी तू मराठी भाषेत आणि ओवीबद्ध स्वरूपात गीतेवर टीका लिही. ती वाचून समस्त जनांना अध्यात्माचा मार्ग सुलभ होईल." ज्ञानेश्वरांनी गुरूची आज्ञा मानली आणि अजरामर, अलौकिक ज्ञानेश्वरीचे निर्माण झाले. भावार्थदीपिका नामक या ग्रंथाला ज्ञानेश्वरी म्हणून ओळखल्या जाते.

ज्ञानेश्वरी रचनेनंतर ही चारही भावंडे पंढरपूरला गेली. तिथे संत नामदेव, गोरा कुंभार, चोखामेळा, नरहरी सोनार, अशा संत मंडळींची भेट झाल्यावर त्यांनी काशी, प्रयाग तसेच द्वारका, गिरनार या उत्तरेच्या व पश्चिमेच्या तीर्थयात्रा करत विठ्ठल भक्तीची ज्योत ठिकठिकाणी प्रज्वलित केली. आळंदीला आल्यावर तापी तीरावरील महान योगी चांगदेवाने ज्ञानेश्वरांच्या भेटीच्या इच्छेने त्यांना कोरेच पत्र पाठविले. ते पाहताच मुक्ताई उद्गारल्या 'चौदाशे वर्षे जगून कोरा तो कोरा' तेव्हा निवृत्तीनाथांनी चांगदेवाचे सर्व चरित्र सांगून ज्ञानेश्वरांना म्हटले "सिद्धत्वाच्या ताठ्याने भरलेला व अहंकाराने सबाह्य वेष्टिलेला हा चांगदेव ब्रह्मज्ञानाविषयी कोरा आहे, तरी तू त्याला निजबोध होईल, असे एक सुंदर पत्र लिही." निवृत्तीनाथांच्या या आज्ञेवरून तत्वज्ञानाने भरलेले ६५ ओव्यांचे ज्ञानोबांनी लिहिलेले पत्र हे चांगदेव पासष्टी म्हणून ओळखले जाते.

संकटात खचून न जाता अग्नीत तावलेल्या सुवर्णाप्रमाणे अधिकाधिक तेजास चढत गेलेल्या चारही भावंडात वडील असलेल्या निवृत्तिनाथांची ख्याती ज्ञानेश्वरांचे मार्गदर्शक म्हणून आहे.

ज्ञानेश्वरांच्या अध्यात्मिक कार्य आणि ग्रंथांचे लेखनामागे निवृत्तीनाथांचा आशीर्वाद होता. ज्ञानेश्वर माऊलींनी आपल्या ग्रंथांचे श्रेय आपले गुरु श्री निवृत्तीनाथ यांना दिले असून निवृत्तीनाथच माझ्या लेखनामागचे खरे कर्ते करविते आहेत असे संत ज्ञानेश्वर म्हणतात. ज्ञानेश्वरांनी त्यांच्याबद्दलचा आदर अनेक ठिकाणी व्यक्त केला आहे. आपल्या सद्गुरुंची थोरवी सांगताना माऊली म्हणतात,

**ज्ञानदेव म्हणे मी चाडें ।सद्गुरुंनी केलें कोडें ।**
**माथा हात ठेविला ते फुडे ।बीजचि वाइले ।।**

निवृत्तीनाथांचा अभंग गाथा प्रसिद्ध आहे. त्यांनी निवृत्ती सार नावाचा ग्रंथ लिहिला आहे असे मानतात, त्यांचा उल्लेख नामदेवांनी

"निवृत्तीनाथांनी ग्रंथ केला 'सार'। ठेविला समोर । विठ्ठलाच्या ।।" असा केलेला आढळतो. निवृत्तीदेवी अथवा निवृतेश्वरी या नावांच्या जुन्या पोथ्या उपलब्ध व उल्लेखित आहे. निवृत्तीनाथांनी पंढरी महात्म्य, श्रीहरी सगुण-निर्गुण रूप वर्णन, सद्गुरुप्रसाद, पंढरीतील काला, उपदेशपर, नामपर, ज्ञानपर अशा विविध विषयांवरील सुमारे ३५७ अभंगरचना केलेली आहे.

नामस्मरणाचे महत्व सांगतांना आपल्या अभंगात निवृत्तीनाथ म्हणतात,

**नामाचेनि बळे तारिजे संसार ।आणिक विचार करू नको ।।**
**नाम जप वेगीं म्हणे हरी हरी ।प्रपंच बोहरी आपोआप ।।**
**नित्यता भजना देव द्विज करी ।नाम हे उच्चारी रामनाम ।।**
**निवृत्ती जपतु राम नाम वाचे ।दहन पापाचे आपोआप ।।**



आपले जीवितकार्य संपले असल्याची जाणीव झाल्यावर ज्ञानेश्वरांनी आळंदीस संजीवन समाधी घेतली. सोपानदेवांना हे दुःख असह्य झाल्याने ते सासवड येथे समाधिस्त झाले. मुक्ताबाईलाही जग उदास झाले, त्या तापीतीरावर विश्वचैतन्यात विलीन झाल्या. आपली सर्व भावंडे आपल्या देखत गेल्यामुळे औदासीन्य उत्पन्न होऊन

**"ज्येष्ठाच्या ही आधी कनिष्ठाने जाणे ।**
**केले नारायणे उफराटे ।।**

उफराटे फार वाटे माझे मनी ।वळचणीचे पाणी आढया गेले।।" असे निवृत्तीनाथांस वाटले. आपणही समाधी घ्यावी असे त्यांना वाटू लागले. निवृत्तीनाथांनी ज्येष्ठ वद्य द्वादशी शके १२१९ रोजी त्र्यंबकेश्वर येथे संजीवन समाधी घेतली. श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर हे संप्रदायाचे आद्यपीठ मानले जाते. त्र्यंबकेश्वर येथील ब्रह्मगिरी पर्वताच्या अगदी पायथ्याशी असलेले सद्गुरू निवृत्तीनाथ महाराजांचे समाधी मंदिर वारकरी संप्रदायाचे श्रद्धास्थान आहे. निवृत्तीनाथांचा समाधी सोहळा वारकऱ्यांच्या उपस्थितीत मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो.

संत सेना महाराज निवृत्तिनाथांबद्दल म्हणतात,

**"जीवा उद्धारण म्हणता निवृत्ती।जुनाट जुगडीचे गुप्त ठेविले।तेचि निवृत्तिनाथ दिधले।ज्ञानदेवे प्रगट केले।जगा दाविले निधान।ध्यान धरिता निवृत्ती।आनंदमय राहे वृत्ती।सेना म्हणे चित्ती धरा।स्मरता चुके येरझारा।''**

निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई, एकनाथ नामदेव तुकाराम... हा महाराष्ट्रातील संतपरंपरेचा जयघोष आपल्या अंतरंगात चैतन्य जागवतो. या जयघोषाने वारकऱ्याला जणू संजीवनी मिळून त्यांची पंढरीची वाट सुखकर होते. या जयघोषातिल संतसप्तर्षीपैकी एक असलेले निवृत्तीनाथ महाराज भागवत संप्रदायाचे आद्यपीठ मानले जातात. संत निवृत्तीनाथ हेच ज्ञानेश्वर माऊलींचे सकल तीर्थ आणि विश्वकल्याणाच्या पसायदानातले श्री विश्वेश्वरावो होत. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात. हे मना, ब्रह्मरूप जे निवृत्तिनाथ त्यांच्यापायी सर्व तीर्थ असल्यामुळे तुही तेथे स्थिर हो. गुरूकृपेने वृत्ति निर्मळ होऊन आतां मी देह आहे ही भ्रांती नष्ट झाली. म्हणून सुखाकरीता इकडे तिकडे तिर्थयात्रेकरिता भटकण्याची जरूरी नाही.

**सकळ तीर्थे निवृत्तीच्या पायीं ।**
**तेथे बुडी देई माझ्या मना ।।**
**आतां मी न करी भ्रांतीचे भ्रमण ।**
**वृत्तीसी मार्जन केलें असे ।।**

निवृत्तीनाथांकडून वाहत आलेल्या नामस्मरणाच्या सूक्ष्म झऱ्याला पुढे ज्ञानेश्वरादि संतांद्वारा भक्तीच्या मोठ्या प्रवाहाचे स्वरूप प्राप्त झाले, तो नंतर भक्तीसंप्रदायाच्या गंगेत विलीन झाला. आजही महाराष्ट्रातच नव्हे तर भारतभर ती भक्तीगंगा वाहत आहे.



सीमा गाडेकर
संपर्क 9423172305

# नशा करी जीवनाची दुर्दशा

आधुनिक केसरी

**काल आमच्या शेजारी राहणाऱ्या दादाचं कार अपघातात निधन झालं .... कारण काय तर आमचा दादा दारू पिऊन गाडी चालवत होता.. तसं पाहिलं तर आमचा दादा फक्त 36 वर्षाचा होता लग्नाला दहा वर्षे झालेल्या दादाच्या संसार वेलीवर दोन सुंदर नाजूक कळ्यां उमलल्या होत्या.... कसा छान सोन्यासारखा सुखाचा संसार चालू होता. पण हळूच माझ्या दादाच्या आयुष्याला व्यसन नावाची वाळवी लागली ......दादा घरच्यांपासून चोरून चोरून बाहेर दारु पिऊ लागला..... नंतर नंतर दारू पिऊन स्वतःच गाडी चालवत घरी येऊ लागला.... घरातील सर्वांनीच त्याला दारू पिऊन गाडी चालवत जाऊ नकोस असं समजावून सांगण्याचा खूप प्रयत्न केला.**

त्याचे उत्तर ठरलेलं मी कंट्रोलमध्ये पीत असतो आणि गाडी पण कंट्रोलमध्ये चालवत असतो... पण काल तो काळा दिवस उगवला व्यसनाच्या आहारी गेलेल्या दादाचा गाडीवरील कंट्रोल गेलाआणि जाताना आमच्या दादाला कायमचा आपल्या सोबत दूर घेऊन गेला.... आयुष्यात स्थिरस्थावर होऊन आनंद उपभोगण्याचे, मुलांबरोबर फिरण्याचे, खेळण्याचे, बायकोबरोबर गप्पागोष्टी, थट्टामस्करी करण्याचे तुझे वय होतं दादा ....परंतु त्या सर्व सुखाला तू कायमचा मुकलास ? तू खोट्या आनंदात रममाण झाला होतास.त्यामुळे खऱ्या आनंदाला तू मुकतोस याचे तुला भानच राहिले नव्हते. तू कायम मित्रांच्याच गराड्यात cheers करत जगायला सुरुवात केलीस.. मित्र असावेतच, पण आपलं कुटुंब सुद्धा आहे, त्याबद्दल आपली जबाबदारी सुद्धा आहे याचा जणू आमच्या दादाला विसरत पडला होता. दादाला कुणाचीच परवा राहिली नव्हती त्याला दिसत होते फक्त त्याचे व्यसनी मित्रआणि दारू..... माणसाला मित्र असावेतपण ते व्यसनी नसावेत... कारण एक व्यसनी मित्र आपल्या मित्रालाही नकळत व्यसन लावून जातो... असे मित्र पाहिले की असं वाटतं मित्राला व्यसनाच्या दुःखात लोटणारे असले कसले हे मित्र ? कुठल्याही छोट्या मोठ्या गोष्टीचा आनंद किंवा दुःख साजरा करण्याचा एकच पर्याय आहे का जगात ? जीवनात आनंद मिळवण्याचे अनेक चांगले मार्ग आहेत परंतु तुम्ही सर्वांनी मात्र वाईट मार्गच निवडला.जगात काय फक्त दारू पिऊनच आनंद व्यक्त करता येतो का ? ? ? 90% लोकांचं असं मत आहे की दारू म्हणजेच आनंद .दारुमुळे होणारे नुकसान कुणालाच कसे दिसत नाहीत...

घरातला कर्ता पुरुष म्हणजे तो त्या घराचा केवळ कुटुंबप्रमुखच नसतो तर कुटुंब नावाच्या इमारतीचा तो मेन पिल्लर असतो....

तसं पाहिलं तर जगासाठी तुम्ही एकसर्वसामान्य व्यक्ती असता परंतु तुम्ही हे विसरता की कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीसाठीतुम्ही त्यांचं अख्ख जग असता.. तुमच्या छोट्या परीसाठी तिचा पप्पा जगातला सर्वात ग्रेट पप्पा असतो.... खेळता खेळता मम्मी माझे पप्पा कधी येणार आहेत ? ? असे आपल्या मम्मीला प्रश्न विचारून भंडावून सोडणारी परी सारखं दाराकडे जाऊन तुम्ही ऑफिस मधून येण्याची वाट पाहत असते.. जसा जसा घरी यायला उशीर होत राहतो तशी तशी बायकोच्या मनाची ही घालमेल वाढत चाललेली असते... लेकर पप्पा ची वाट पाहून झोपी जातात... परंतु व्यसनात बुडालेल्या तुमच्यासारख्या पप्पाला दारूचा ग्लास हातात घेतल्यावर आपल्या परीचा चेहरा का बर आठवत नाही ?.. कातुम्हाला तिच्या भविष्याची चिंता सतावत नाही ? नशा रुपी सुरंग आपला अकाली मृत्यू आणून आपला संसार उध्वस्त करू शकतो हा विचार का तुमच्या मनात कधी येत नाही ? ? ? विचार करण्यासारखी गोष्ट..



खरं सांगू दादा तुला मुळात दारू वाईटच असते मग ती कितीही महाग असु द्या...आज पर्यंत दारूमुळे किती संसार उध्वस्त झाले. किती स्त्रियांना विधवा म्हणून आपला आयुष्य घालवावं लागलं ? कित्येक मुलांना बापाच्या छत्र छायेला मुकावं लागलं ? कित्येक मुलींना पितृ सुखापासून वंचित राहून वनवासी म्हणून जीवन जगावं लागलं ? ? म्हणून म्हणते माझ्या दादांनो कृपया व्यसन करण्याच्या आधी हातात दारूचा ग्लास घेऊन व्यसनाला सुरुवात करण्याआधी कृपा करून आपल्या कुटुंबाचा विचार करा..... आपल्या थकलेल्या आई-वडिलांचा चेहरा डोळ्यासमोर येऊ द्या, आपल्या पश्चात आपल्या तरुण पत्नीकडे वखवखलेल्या नजरेने पाहणारा समाज डोळ्यासमोर येऊ द्या.. आपल्या बहिणीच्या सुखदुःखात तिच्या पाठीशी आपल्याला खंबीर उभे राहायचे याची जाणीव ठेवा... तुमची लाडाची परी उद्या मोठी झाल्यावर तिच्या लग्नात कन्यादानासारखं सर्वात श्रेष्ठ दान करण्याचं पुण्य आपल्या पदरी पाडून घ्या मुलीला सासरी वाटेलावताना धाय मोकलून रडणारा बाप समाजाला दिसू द्या....

आपल्या खांद्यावरील सर्व जबाबदाऱ्या पार पाडण्याइतपत तरी निरोगीआयुष्य जगण्यासाठीव्यसनापासून दूर राहून जगा.. आपल्या कुटुंबीयांना वेळ द्या....

माझ्या लाडक्या दादांनो एक गोष्ट सदैव लक्षात असू द्या आयुष्य एकदाच मिळतं ते भरभरून जगा...

माझ्या दादांनो जीवनात खूप एन्जॉय करा पण आपलंच आयुष्य बरबाद करून नाही.

# दुर्गम रस्त्यांचा सुगम प्रदेश



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**सिक्कीम दार्जिलिंगला जायचे तर बार्डोग्रा विमानतळावर उतरावे लागते. हे पश्चिम बंगाल मध्ये येते. सिक्कीम राज्यात विमानतळ नाही. रेल्वेने जाणेही तितके सोयीचे नाही. आम्ही दहा वर्षे प.बंगाल मध्ये ( खरगपूर येथे) राहिलो. आता सारेच बदलले आहे.पण एकूण शहराचा बकालपणा तोच. या राज्याचा विकास लोकांपर्यंत पोहोचत नाही. बागडोग्रा येथून गंगटोकला कारने जावे लागते. १७००मीटर उंचीवर चे गंगटोक ही सिक्कीम ची राजधानी. हे सुंदर हिल स्टेशन आहे. १९४७मध्ये इतर संघ राज्या प्रमाणे सिक्कीम चा भारतात विलय झाला खरा. त्याआधी १७व्या शतकात या भागाने नेपाळ भूतानचे आक्रमण पचवले.**

१९७५ मध्ये २२वे सर्वात छोटे राज्य म्हणून सिक्कीम पूर्णपणे भारतात सामील झाले. सिक्कीम शब्दाचे मूळ सुखिम मध्ये आहे. सुखीम म्हणजे सुखी परिवार, वेगळ्या पूर्वेला चीन, पूर्वेस भूतान, पश्चिमेला नेपाळ अन् दक्षिणेला बंगाल अशा चौकटीने वेढलेले सिक्कीम वेगवेगळ्या भाषा, संस्कृती, चालीरीती जपत आपली स्वतंत्र ओळख ठेऊन आहे. मोठ्या आरामदायी गाडीने प्रवास करताना इथल्या नागमोडी अरुंद घाट रस्त्यांचे वेगळेपण जाणवते. अशा घाटांत भारतात इतर ठिकाणी फक्त एकेरी वाहतूक असते सुरक्षेच्या दृष्टीने. पण इथे सर्व प्रवासात या निमुळत्या उंच सखल सर्पाकार रस्त्याने चक्क दुहेरी वाहतूक चालते. प्रवाशाची अन् ड्रायव्हरची सत्वपरीक्षा पाहणारा हा धोकादायक प्रवास येथील कुशल शांत स्थिर चालकामुळेच सुसह्य होतो! चढताना ७०-८० अंशाची चढण अन् उतरताना देखील तशीच धोकादायक उतरण, शिवाय घाटातील नागमोडी अतिघातक वळणे.. सुरुवातीला आपण जीव मुठीत घेऊनच प्रवास करतो. मग हळू हळू त्याची सवय होत जाते. इथले लोकल वाहन चालक आपले मित्र होतात. ते इथली ओळख करून देतात. त्यांचा शांत संयमी स्वभाव आपल्याला आवडायला लागतो. एरवी एकमेकावर डाफरणे, घाणेरड्या शिव्या देणे, क्वचित एकमेकांच्या जीवावर उठणे, असेच चालक बघण्याची आपल्याला सवय झाली असते. त्यामुळे विपरित परिस्थितीत डोकं शांत ठेवीत, इतरांना समजून घेत मार्ग कसा काढायचा हे इथल्या चालका कडून शिकावे! अनेकवेळा या गाड्या जुन्या हिंदी बोलपटाच्या चुंबन दृष्यासारख्या परस्परांना अगदी जवळ भिडल्या सारख्या भासतात! पण दुसऱ्याच क्षणी त्या गीताची पुढची ओळ गाण्यासाठी विलग होतात! एरवी या रस्त्यावर रोज अनेक अपघात व्हायला हवेत. पण तसे दिसत नाही हे खरे. त्यामुळे इथल्या वाहन चालकांना मला चक्क साक्षात दंडवत घालावासा वाटला! गंगटोक येथील रुमतेक मॉनेस्ट्री बघण्यालायक आहे. इथे तिबेटीयन बुध्द धम्माचा प्रभाव दिसतो. मठ म्हणजे देवाचे घर,शांती स्थल अशी धारणा. नालंदा इन्स्टिट्युट, गोल्डन स्तूप या वास्तू आपल्याला वेगळ्या विश्वात घेऊन जातात. कांचनगंगा देशातले सर्वात उंच, तर जगातले तिसऱ्या क्रमांकाच्या उंचीचे पर्वत शिखर. हिमालयाच्या या बर्फाच्छादित रांगा वेगवेगळ्या ठिकाणाहून बघणे, हा अभूत पूर्व आनंद दायी अनुभव असतो. दार्जिलिंग जवळील टायगर हिलचा सूर्योदय बघायचे तर पहाटे अडीच ला उठावे लागते. इकडे सूर्योदय साडेचार लाच होत असल्याने तिथे वेळेवर पोहोचायचे तर आधीच निघावे लागते. इथे कुठेही कधीही ट्रॅफिक जाम होतोच.त्यामुळे दोन तीन किलो मिटरच्या प्रवासाला दहा मिनिटे ते दोन अडीच तास असा कितीही वेळ लागू शकतो!! टायगर हिलवरचा सूर्योदय आकाशात बहु रंगाची नयनरम्य उधळण करीत होतो. त्या तांबूस, पिवळ्या, केशरी रंगाची किरणे शेजारच्या कांचनगंगा शिखरावर पडतात तेव्हा जो काही बहुरंगाचा नजारा दिसतो तो शब्दात पकडणे कठीणच. पहाटेच्या थंडीत शेकडो, हजारो पर्यटक हा नजारा बघायला धडपडत येतात. सिक्कीमची गंगा म्हणजे तिस्ता नदी प्रवासात डावी उजवीकडे नेहमी साथ देत तुमच्या हातात हात घालून वाहत असते तुमच्या बरोबर. निसर्गाने माणसाला साथ देण्याचे असे उदाहरण विरळा. आपण नद्या, जंगल, तिथले





नैसर्गिक, प्राणी, पक्षी, दुर्मिळ होत चाललेली जनावरे, वृक्ष सगळ्यांचाच सत्यानाश करायला निघालोय. इथला निसर्ग लडिवाळपणे तुम्हाला हातात हात घालून बरोबर घेऊन चालतो! मठात विविध कोर्सेस शिकवले जातात. १६व्या कर्मापाचे पवित्र अवशेष स्तुपात जपून ठेवले आहेत.कोणत्याही विषयाचे नीट विश्लेषण करा, प्रश्न विचारा, शिकवण आचरणात आणा, असा इथला अभ्यास असतो. दुःख, सोसणे, ताप, सहन करणे रागावर नियंत्रण, सत्याचा शोध असा हा बुध्द धम्म प्रवास असतो. साधनेचे आठ मार्ग आहेत. इथे मंत्र पठण चालले असते. इथल्या संग्रहालयात जुनी सूत्रे, मंत्र, ताड पत्रावर, लाकडावर कोरली आहेत. जपून ठेवली आहेत. पेलिंग, नेमची येथील चारधाम टेम्पलमध्ये सर्व धाम दर्शन तर होतेच पण बारा ज्योतिर्लिंग दर्शन देखील एकाच ठिकाणी होते.या भागातील एकूणच हिंदू, बुध्द विचार, आचार एकमेकाच्या हातात हात घालून प्रवाहित होताना दिसतात. जे आजकाल दुर्मिळ झाले आहे. आम्ही श्रेष्ठ, आमची भाषा, आमचा धर्मच श्रेष्ठ हा संकुचित विचार बळावत चालला आहे. येथील १३०फूट उंचीचा बुध्द पुतळा बघण्यालायक आहे.

ट्सोंगो झील हा सर्वात उंची वरचा जलस्रोत समजला जातो. तो १२३००फूट उंचावर आहे. ऋतू बदलतात तसे या जल स्रोताचे रंग देखील बदलत जातात. हा निसर्ग चमत्कार. तो स्प्रिंग सिझन ला केशरी, निळा होतो.. तर हिवाळ्यात हिरव्या गर्द शी सारखा बदलतो! या जल स्रोत जवळ नवस पूर्ण करणारे मंदिर आहे. जिथे भाविकांची गर्दी असते. सिक्कीम एकूणच श्रध्दाळू प्रदेश आहे. प्रवासात अनेक ठिकाणी रंगी बेरंगी पताका दिसतात. त्यावर शांती मंत्र, कल्याण वचन लिहिली असतात. अनेक ठिकाणी पांढरे झेंडे दिसतात. ते घरच्या ज्येष्ठ, प्रिय मृत व्यक्तीच्या स्मरणार्थ लावले असतात. ही श्रध्दा डोळ्यात भरते. नाथुला पास हे १४४५० फूट उंचीवरील भारत तिबेट,चीन सीमेवरील ठिकाण. तिथली वात बर्फाळ पहाडीतून जाते. अतिशय थंड वातावरण. पण बर्फात खेळण्याची मजा वेगळीच असते. वय विसरायला होते. इथून बर्फाळ पहाडावर चालत गेले की चीनी भाग, तिथल्या तुरळक इमारती दिसतात. त्यांचा झेंडा दिसतो. भारत चीनचा खुला व्यापार इथूनच व्हायचा.इकडच्या सीमेवरून व्यापारी देवघेव व्हायची. आता करोना काळा पासून हा व्यापार पूर्ण बंद झाला. मेड इन चायना बाजार देखील बंद झाला. बेकायदेशीर देवघेव वेगळी. ती खुले आम सारीकडेच चालते! इथे सीमेवर आपले जवान अतिशय कठीण परिस्थितीत राहून देशाचे रक्षण करतात. हिवाळ्यात तर सामान नेणे आणणे अशक्य. पूर्ण रस्ता दुर्गम. हेलिकॉप्टरदेखील उतरणे अशक्य. अशा परिस्थितीमध्ये ही मंडळी कशी राहतात याचे खरच नवल वाटते. आपण आपल्या घरी ड्रॉइंग हॉलमध्ये लोळत सैन्यावर शंका घेतो.सरकारी धोरणावर अपुऱ्या माहितीच्या आधारे टीका करतो.



खरे तर त्यांचे कष्ट, त्याच्या कुटुंबाची मानसिक स्थिती या साऱ्याचा विचार करता आपल्याला लाज वाटली पाहिजे शंका घेतांना! टीका करताना! खरे तर आपण या जवाना पुढे, त्याच्या कुटुंबा पुढे नत मस्तक व्हायला पाहिजे. हा एकूणच प्रदेश तीन चार देशाच्या सीमा लगत असल्यामुळे ठीक ठिकाणी लष्करी छावण्या दिसतात. सुरक्षेचे उपाय म्हणून काही ठिकाणी पासपोर्टच हवा असतो. आधार प्यान कार्ड चालत नाही! नाथुला येथे बाबा हरभजन सिंग मंदिर आहे.१९६८मध्ये सीमेवर लढताना धारातीर्थी पडलेल्या जवानाचे हे स्मृती मंदिर. दार्जिलिंग वास्तव्यात रिव्हर वॉटर राफ्टिंग चा धाडसी अनुभव घेता येतो. इथे हिमालयन माउंटनिरिंग इन्स्टिट्युट आहे. इथे शिखर चढण्याचे अती कठीण प्रशिक्षण दिले जाते. या प्रवासाला, ट्रेनिंगला लागणारे साहित्य, पोशाख, अवजारे यांचे सुंदर मुजियम इथे आहे. इथे एक माहितीपट दाखवतात. ज्यात सर्व मोहिमा, त्या जिंकलेल्या व्यक्ती यांची छान माहिती मिळते. करोना काळात सैन्याच्या मदतीने स्वातंत्र्याला ७५वर्ष पूर्ण झाली, त्या निमित्ताने ७५ किलो वजनाचा, ७५००० वर्ग फूट आकाराचा राष्ट्रीय ध्वज तयार करून हिमालय शिखरावर सर्वात उंच जागेवर फडकवला गेला. हा ध्वज तयार करणे, रंगवणे, अन् उंच शिखरावर घेऊन जाणे, तिथे ध्वज रोहण करणे, हे काम अतिशय कठीण होते. मुख्य म्हणजे हे करोना काळात घडले! असे काही पाहून ऐकून ऊर अभिमानाने भरून येतो. इथल्या टोय ट्रेनने प्रवास करण्याची मजा काही न्यारीच असते. अठराव्या शतकात ब्रिटिशांनी ही मीटर गेज छोटी ट्रेन चहाच्या व्यापारासाठी निर्माण केली. १८७६ साली या ट्रेनने न्यू जालपाई गुडी ते दार्जिलिंग साधारण ११० कि.मी. प्रवासाला तीन दिवस लागायचे. प्रवासात १३स्टेशन होती! १८८३ला हे काम पूर्ण झाले. घुम रेल्वे स्टेशन भारतातले सर्वात उंच स्टेशन आहे. आता दार्जिलिंग घूम प्रवासाला ४५मिनिट लागतात. ही ट्रेन वाहतूक सुरू असलेल्या रस्त्याच्या अगदी लागून धावते. रांगते असे म्हणायला हवे! काही घराच्या दरवाजा समोरून अगदी पायऱ्या ना लागून जाते.एव्हढेच नव्हे तर गर्दीचा धावता रस्ता प्रवासात एकूण १३४ वेळाक्रॉस देखील करते. या क्रॉसिंगवर वाहतूक कंट्रोल करणारे कुणी नसते.याच अरुंद रस्त्यावरून टॅक्सी, मोठ्या गाड्या यांची वाहतूक चालली असते. फारसे अपघात होत नाहीत. अपघाताचे प्रमाण नगण्य आहे. याचे पूर्ण श्रेय इथल्या कुशल थंड दिमाखाच्या चालकांना जाते. इथल्या सीमेवर रक्षण करणारे, थंडी वारे सोडणारे सैनिक अन् नागमोडी अरुंद उंच सखल रस्त्यावर गाड्या चालवणारे चालक यांना साक्षात दंडवत घालावासा वाटतो!दार्जिलिंगमध्ये एका गाडीच्या आत समोर लिहिले होतेः आम्ही नेपाळी बोलतो. पण नेपाळी नाही. भारतीय आहोत! आम्ही कुणाचे हाड मोडू पण हृदय दुखावणार नाही. या वाक्यात सर्व काही आले.ही इथली गुरखा मंडळी अतिशय प्रामाणिक, जीवाला जीव देणारी, जीव लावणारी आहेत. दार्जिलिंग प. बंगालमध्ये असूनही इथले नेपाळी, तिबेटी, आसामी मिक्सकल्चर, मन लुभावणारे आहे. इथले चहाचे मळे प्रसिध्द आहेतच. टेमी टी गार्डनचा चहा जगभरात निर्यात होतो. चहा कसा तयार होतो हेही प्रत्यक्ष बघायला मिळते. इथला चहा लाईट असतो.इराणी चहा, येवले चहा पिणारे या चहाला पाणचट म्हणतील! चहाच्या मळ्यावर काम करणाऱ्यांचे जीवन खडतर, मेहनतीचे असते. त्यांना फार कमी वेतन मिळते कष्टाच्या तुलनेत. शेकडो वर्षांपूर्वी ब्रिटिशांनी समुद्र मार्गे जहाजातून चीनी कामगार, वेठ बिगार इकडे आणले. त्यांना गुलामासारखे वागवले. त्याच्या कुटुंबापासून तोडले. या विषयावर एक आसामी लेखिकेची विदारक सत्य कथन करणारी कादंबरी नुकतीच वाचली होती. अजूनही चायना टाऊन भागात राहणारे, मेड इन चायना वस्तूचा व्यापार करणारे, चीनी खाद्य पदार्थांचे हॉटेल चालवणारे विस्थापित चीनी आपण बघतोच. त्यांचे मूळ चीनमध्ये तर शरीर इथे आहे! ब्रिटिशांनी फक्त भारतीयांनाच नव्हे तर चिन्यानाही गुलाम केले!इकडच्या भागात मोमो नावाचा खास खाद्य पदार्थ मिळतो. वरून उकडीचे मोदक अन् आतून स्प्रिंग रोल ( व्हेज किंवा चिकन म्हणजे नॉन व्हेज ) असे या पदार्थाचे स्वरूप. तरुण पिढी तो आवडीने खाते. इकडची लोककला, नृत्य कला, संगीत हे सारे इथल्या जमिनीशी जुळले आहे. इथल्या पारंपरिक नृत्यात कौटुंबिक माया, जिव्हाळा तर आहेच, पण इथल्या पारंपरिक चाली रीतीचे सुंदर दर्शन देखील त्यातून घडते. मोदीविषयी आदर देखील सहज दिसतो, जाणवतो. प्रसिध्द गायक संगीतकार भूपेन हजारिका याच भागातले. आपण जसे लताला देव मानतो तेच स्थान इकडे भूपेन हजारिकाला आहे. मी त्यांची बंगाली,भाषांतरीत हिंदी गाणी ऐकली आहेत. लेकीन चित्रपटातले दिल घूम घूम करे..घबराये.. हे गीत त्यांचेच.परतताना सिलिगुडीजवळ एक चिकन नेक म्हणून चिंचोळा भाग लागतो. तिथून चीन, नेपाळ, भूतान, बांगला देश अशा चार देशाच्या सीमा अगदी जवळ आहेत. त्यामुळे या भागात सीमा सुरक्षा दलाच्या जवानांना सदैव सतर्क रहावे लागते. डोळ्यात तेल घालून जगावे लागते. ते जागतात म्हणून आपण आपल्या घरी शांत झोपू शकतो, या कृतज्ञ भावनेने परतताना ऊर अभिमानाने भरून येतो.!



# व्हीलचेअर



जितेंद्र रायपुरे
संपर्क 8806550920

आधुनिक केसरी

विजय हा तिसऱ्या वर्गातील हुशार विद्यार्थी. त्याच्या लहान बहिणीचे नाव सुनीता. ती यावर्षी पहिल्या वर्गात दाखल होणार होती. सुनीता जन्मापासून पायाने अपंग असल्याने शाळेत नाव दाखल करूनही ती शाळेत जाऊ शकणार नव्हती, याचे विजयला वाईट वाटत होते. शिवाय घरी त्याच्यासोबत सुनिता खेळू शकत नव्हती . घरी तो फार कंटाळून जायचा. विजय काही करत असताना सुनीता केवळ त्याच्याकडे पाहत असायची. त्याने ठरवले, आपल्या बहिणीसाठी काहीतरी करावे.

आई बाबाने खाऊसाठी दिलेले पैसे तो वाचवून जमा करु लागला. घरी आलेले पाहुणे दहा- वीस रुपये दिले की ते जमा करून ठेवत असे. एकदा त्याचा मामा आला, जातांना त्याला शंभर रुपये देणार होता. पण त्याने शंभर रुपये न घेता पाचशेची नोट मागितली. ते त्याच्या मामाला आणि आईला आवडले नाहीं. पण विजयच्या हट्टापुढे काही चालले नाही. पाचशे रुपये देऊन मामा निघून गेला. त्या दिवशी तो आईचा चांगलाच मार खाल्ला. पण तो पैसे जमा करत राहिला. एक दिवस सर्व पैसे काढून मोजून घेतले. साडेतीन हजार रुपये भरले. आता त्याच्या चेहऱ्यावर हसू आले. त्या सर्व पैश्याची गाठोडी बांधली आणि तो त्याच्या वर्गशिक्षकाकडे गेला. त्याच्या हातात एक पांपलेट होता. ती पैश्याची गाठोडी आणि हातातील पांपलेट सराकडे दिलें. त्या पांपलेट्वर एक जाहिरात होती,3 500 रुपयात व्हीलचेअर! विजय,"सर, हे पैसे घ्या आणि माझ्या बहिणीसाठी एक व्हीलचेअर विकत आणा". सरांनी त्याच्याकडे आश्चर्याने पाहून विचारले,"एवढे पैसे कुठून आणले ?" विजयने सर्व कहाणी सांगीतली. बहिणीसाठी विजयने केलेली धडपड पाहून सरही भारावून गेले. सरांनी त्याचे वर्गात खूप कौतुक केले.

दुसऱ्या दिवशी सरांनी व्हीलचेअर विजयच्या घरी आणली. व्हीलचेअर पाहून घरातील सर्वांना आश्चर्य वाटले. सुनीताचा आनंद गगणात मावेनासा झाला. सरांनी, विजयने काय काय केले हे सर्वांना सांगितले. आईच्या डोळ्यात अश्रू आले. आईने विजयला घट्ट मिट्ठी मारली. विजयची बहीण विजयसोबत शाळेत जाऊ लागली.

# वारकऱ्यांची शाळा भरली वारीच्या मळा...



दिलीप नामदेव धायगुडे
संपर्क क्र.: ७७३८०३१११५

आधुनिक केसरी

**छंद हा प्रत्येकालाच असतो, परंतु छंदाचेही अनेक प्रकार पडतात. मग ते मराठी व्याकरणानुसार अनेक मात्रांचे, वृत्तांचे असो, वा एखाद्या आवडत्या विषयांमध्ये आपले मन रमवून त्यामध्ये मग्न होणे. एवढं मात्र खरं आहे की, छंदाला मात्र वय, जात, धर्म याचा किंचितही संबंध नसतो, तो एक अंतर्मनातून आलेली प्रेमाची, आपुलकीची हाक असते. कोणी शिक्षित असो वा अशिक्षित याकरिता प्रत्येक गोष्टींमध्ये किंवा मनात योजलेल्या एखाद्या विषयांबद्दल असते. तो आपल्या मनातील सुखदुःखाच्या गाभारी त्या छंदाने स्वच्छ करीत असते. एवढेच नव्हे तर स्वतःचा छंद जोपासत समाजामध्ये त्या छंदाचे प्रदर्शन होत असताना ना मनात स्वार्थ, ना अहंकार, समाजातील कितीतरी चांगल्या वाईट व्यक्तींवर त्या छंदाचा परिणाम होऊन ते ही स्वतः आत्मसात करण्याचा प्रयत्न करतात.**

लहानांपासून ते थोरांपर्यंत मोठेपणाचा कोणीही दुज्या भाव न करता प्रत्येकाच्या छंदाचा आदर करून ते दृष्टिक्षेपास आणण्याचा नक्कीच प्रयत्न करीत असतात. कोणी गरीब, कोणी श्रीमंत, तर कोणी काळा, तर कोणी गोरा यामध्ये कशाचाही भेदभाव न करता आपल्या मिळालेल्या कार्यातून किंवा कार्य करीत असताना आपापल्या छंदाची आवड जपत असतो. मग या छंदाचा फायदा किंवा तोटा काय आहे याची तसूभरही मनात शंकेची पाल मात्र चुकचुकत नसावी, कारण यामध्ये ना प्रगती ना अधोगती यामध्ये असते फक्त मानसिक समाधान आणि एखाद्या व्यक्तींविषयी किंवा विषयासक्ती आवड शीण घालवण्याचं एक उत्तम साधन! एखाद्या बागकामाचा छंद जोपासण्यातून मिळणारा दहा मिनिटे झाडांबरोबर सहवास संपूर्ण दिवसाचा थकवा दूर करायला पुरेसा ही असतो. सगळीच मुलं शाळेत जातात, अभ्यासही करतात; पण एखादा विद्यार्थी गाणे गुणगुणत असतो का, तर तो आपल्या छंदात मग्न असतो. छंद हा आनंद निर्माण करण्याचा कारखाना. छंद हे निराशेला, व्यसनांना लांब ठेवतात, एवढंच नव्हे तर छंदच आपल्याला उत्साह देतो, कणखर बनवतो आणि आपल्यात आत्मविश्वास वाढवतो.

दरवर्षी सालाबाद प्रमाणे ज्ञानियांचा राजा श्री संत ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराज "ग्यानबा तुकाराम"च्या गजरात पालखी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा होतो. ज्ञानेश्वर माऊलींना त्यांचे भक्त प्रेमाने माऊली असे म्हणतात. एक आध्यात्मिक नेता म्हणून ज्ञानेश्वरांच्या कार्याचा भारतीय समाजावर चिरस्थायी प्रभाव पडलेला आहे. त्यांनी भावार्थ दीपिका हा ग्रंथ दैवी प्रतिभेने हाताने लिहिला गेला. आज संपूर्ण महाराष्ट्र जो आत्मीयतेने, शुद्ध अंतकरणाने ज्या आनंद सोहळ्याची आतुरतेने वाट पाहत असतो, तो आनंद सोहळा म्हणजेच माऊलींचा पालखी सोहळा. संपूर्ण भक्त संप्रदाय हा या वारीकरिता मोठ्या उत्साहाने तयारीला लागत. वै. ह.भ.प हैबतबाबा यांच्या प्रेरणेने सुरू झालेला हा पालखी सोहळा खरोखरंच विलोभनीय आहे. या पालखी सोहळ्याकरिता संपूर्ण महाराष्ट्रातून, प्रत्येक गावातून एक-एक दिंडी या माऊलींच्या पालखी सोहळ्याकरिता जाते. मुखी नाम-जप करीत परमेश्वराशी संलग्न होऊन पूर्णतः तल्लीन होऊन जातात. शेतामध्ये काम करणारा शेतकरी शेतातील आपापली शेतीची कामे आटपून वारीकरिता सज्ज झालेला असतो. 20- 21 दिवस चालणारा हा पालखी सोहळा भक्ती मार्गातील प्रत्येक पाऊलवाटेवर माऊली या शब्दांचा जयघोष नावाने नामजप चालू असतो; परंतु त्या सोहळ्यामध्ये आणि नामजपमध्ये एवढी प्रचंड ताकद असते की, ना कधी आमचा वारकरी थकतो, आळस येतो, ना आजारी पडतो, ना कशाची भीती असते! कधी एकटा, तर कधी मेळाने, तर कधी दिंडीसोबत रस्त्याने हातात भगवी पताका, गळ्यात माळ, विणा घेऊन मजल-दरमजल करीत वारीचा मनमुराद आनंद घेताना दिसून येतो.

माऊलींच्या पालखी रथाच्या पुढे नोंदणीकृत 27 दिंड्या, तर पाठीमागे नोंदणी करून 251 दिंड्या तर नोंदणी नसलेल्या 125 ते 150 दिंड्या असतात. माऊलींच्या रथाला बैल जोडी जी मजबूत शरीरयष्टी असलेली आणि मानाची असते. तो आळंदी मधीलच लोकांना मान दिला जातो. ऊन, वारा, पाऊस, थंडी याचा कोणताही प्रभाव या वारीतील वारकऱ्यांवर होत नाही. पालखी सोहळ्याच्या समितीमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार कोणत्या गावी, किती वेळ, किती दिवस मुक्काम आणि ठराविक अंतरावर काही वेळेपुरता विसावा घ्यायचा याचे तंतोतंत नियोजन ठरलेले असते. प्रत्येक गावात, शक्यतो गावाबाहेर या पालखी तळाची व्यवस्था केलेली असते, मग त्या ठिकाणी हरिपाठ, कीर्तन, भजन यामध्ये सर्व वारकरी



दंग होऊन जातात. आपले दुःख, चिंता, रोग, प्रपंच विसरून फक्त भक्ती नामात दंग झालेले पहावयास मिळतात. एका गावावरून दुसऱ्या गावी जाताना दिवे घाटातून जेव्हा पालखीचे प्रस्थान चालू असते तेव्हा संपूर्ण घाट हा लाखो भक्तांच्या संगतीने गजबजलेला दिसून येतो. कोण लहान असो, वा मोठा.. वयाच्या सीमांची गणती न आखता प्रत्येकजण एकमेकांना फक्त "माऊली" या नावानेच हाक देतो. या पालखी सोहळ्या दरम्यान उभे रिंगण हा एक प्रकार आढळतो की, यामध्ये अश्व गोल गोल पळत असते, अशी आख्यायिका आहे की, माऊली स्वतः या अश्वावर बसून फिरतात. खूप मोठा हा रिंगण सोहळा या पालखी सोहळ्या दरम्यान तीन ठिकाणी पार पडला जातो. या पालखी सोहळ्याच्या दरम्यान आषाढी एकादशी हा जो वर्षातून सर्वात मोठा उपवास की, या दिवशी पालखी पंढरपुरात येते आणि माऊलींचे सर्व भावंडे एकत्र येऊन साजरी होते. मग बारस पासून प्रत्येक दिंड्या, काही तेथून तर काही आळंदीत जाऊन पुन्हा आपापल्या गावी रवाना होतात.

टाळ मृदुंगाच्या गजरात संपूर्ण वारकरी मंडळी या वारीमध्ये भक्ती रसाने पूर्ण न्हावून निघतात. एक सूर, एक ताल, एक विचार, एक संगती या समुदाय सूत्राने चालणारी ही वारकऱ्यांची शाळा आज खऱ्या अर्थाने या वारीच्या मळ्यात भरल्यासारखी वाटते. निःस्वार्थ भावनेने, अहंकाराचा कोणताही स्पर्श मनाला न लागता सकारात्मक भावनेने या वारीच्या मळ्यात कष्ट करणारा वारकरी आज मनानं खूप मोठा असल्याचे दिसून येते. वारीतून संप्रदयाची सामाजिकता आणि समाजाभिमुकता स्पष्ट होते. कोरोनाकाळात ही ओस पडलेली शाळा आज तुडुंब गर्दीने ओसंडून वाहताना दिसून येते. त्यांच्यामुळे त्यांनाच नव्हे तर रस्त्याने जाताना, येताना पक्षी, प्राणी, झाडे, पान-फुले ही या वारकऱ्यांच्या अभंगाच्या प्रत्येक तालावर नाचताना, डोलताना दिसून येतात. त्यामुळे हा अविस्मरणीय माऊलींचा पालखी सोहळा आणि त्या सोहळ्याकरता रंग, रूप देणारा वारकरी यामुळे एक आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण तयार झालेले पहावयास मिळते आणि या सोहळ्यानंतर प्रत्येक वारकऱ्यांच्या डोळ्यातून नक्कीच आठवणींचे आणि भक्ती भावाचे अश्रू नक्कीच ओघळताना दिसून येतात.

# उद्धवबापू फड: लोकपंढरीचा कृतिशील वारकरी!




प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**माणसं येतात आणि जातात परंतु जातांना आपल्या कार्यकर्तृत्वाने आपले नावलौकिक अजरामर करतात! विल्यम शेक्सपिअर जरी म्हणाला असला, 'नावात काय आहे?' तरी इथे मृत्युलोकात नावातच सर्वकाही आहे. माणसं नावावरून भांडणं करतात, आपले नाव मिटू देत नाहीत. नावात अनंत अर्थ दडलेले असून आज माणसाला आपले नाव, अर्थ आणि त्यानुषंगाने त्याची यथार्थता सिद्ध करावी लागते. असे केले तरच त्याच्या नावाचे सार्थक होते! हाच ध्यास घेऊन जीवनाचा व्यास विस्तारण्याचे काम अनेक माणसे अहोरात्र करत असतात. आपले नाव आणि अस्तित्वापेक्षाही अविश्रांत काम करणारी माणसे आजही आपल्या भोवताल आहेत! असेच नाव म्हणजे श्री उद्धवबापू फड!**

उद्धव म्हणजे उत्साह, आनंद! 'निजतत्त्व कथुनि ब्रह्मादि सुरांसि विपुल उद्धव दे' म्हणजे उद्धव!' आत्मतत्व विषद करून ब्रह्मानंदी टाळी लावून जगाला विपुल प्रमाणात भक्ती-ज्ञान देणे म्हणजे उद्धव! भगवान श्रीकृष्णांनी आप्तेष्टांशी युद्ध नाकारणाऱ्या धनुर्धर अर्जुनाला श्रीमद् भगवद्गीता आणि स्वज्ञान-अहंकारात अडकलेल्या उद्धवाला उद्धव गीता सांगितली! योग, भक्ती आणि ज्ञानाचा उपदेश उद्धवांना श्रीकृष्णाकडून मिळाला! याच नावाप्रमाणे उद्धवबापू फड हे सुद्धा भक्ती, ज्ञान आदींनी आपले जीवन आणि आपला भोवताल प्रफुल्लीत करताहेत! अहमदपूर तालुक्याच्या डोंगरपट्यातील देवकऱ्याचे उद्धव फड हे आज महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीत लातूर जिल्हा परिषद येथे संवाद तज्ञ म्हणून काम करतांना अल्पकाळात आपल्या उत्तुंग कार्याने आपल्या परिघाबाहेर झेपावून काम करतांना सर्वपरिचित झाले आहेत! 'अंतरी निर्मळ, वाचेचा रसाळ' असलेले उद्धव फड हे घरूनच प्रगल्भ वारकरी, संत विचारांचा वसा-वारसा घेऊन बाहेर पडलेले व्यक्तिमत्व! देवकरा गाव म्हणजे अग्नीसंत माधवबाबा मोळवणकर यांच्या कृपाशीर्वादाने पुनीत झालेले



गाव! हीच प्रगल्भ शिदोरी घेऊन महाविद्यालयीन काळापासून उद्धवबापू फड आपल्या कार्याने आपल्या परिसरावर आपली मोहर उमटवत आले आहेत. अलीकडच्या काळात माणसं शिकून आपल्याच कोषात बंदिस्त होतांना पहिले की; उद्धव फडांचे अप्रूप वाटल्याशिवाय रहात नाही! अर्ध्या हळकुंडाने पिवळे झालेले, कुठलेही उच्च शिक्षण, पत्रकारितेचे आणि वाचन-लेखनाचे ज्ञान नसतांना अनेकजन स्वतःला पत्रकार म्हणून मिरवतांना संपादकाचा आव आणणारे पहिले की त्यांची किव येते! असं वाटतं यांना बाळशास्त्री जांभेकर आणि पत्रकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर एकदा वाचून दाखवावेत! उद्धव फड मात्र याला पूर्णतः अपवाद आहेत. एम.एम.सि.जे.(मास कम्युनिकेशन), बी.जे.एम.एस.(पब्लिक रिलेशन), आणि पत्रकारितेत एम.फील. उच्च शिक्षित असलेले संशोधक उद्धव फड यांच्याशी संवाद साधतांना त्यांच्यात कोणताही वेगळा अभिनिवेश जाणवत नाही, हेच त्यांच्या सर्वांगीण यशाचे गमक म्हणावे लागेल! लातूर येथे संवाद तज्ञ या अत्यंत संवेदनशील-जबाबदारीच्या प्रशासकीय पदावर कार्य करण्याअगोदर त्यांच्याकडे विविध क्षेत्रात कार्य करण्याचा दांडगा अनुभव होता. त्या बळावरच ते इथे रुजले गेले हे त्यांच्या विस्तारित परिचयावरून दृगोचर होते. पदवीचे शिक्षण घेताना त्यांच्या उपक्रमशील स्वभावामुळे त्यांना दै.प्रतीव्यवहार, दै.लोकमत, दै.सकाळ, दै.तरुण भारत, दै.तरुण भारत सारख्या नामवंत दैनिकांत वृत्तलेखन, वृत्त संपादन, जाहिरात व्यवस्थापनापासून ते उपसंपादक पदांपर्यंत त्यांनी अगदी कमी वयात काम करून आपल्या कामाची मोहर उमटवली! लेखणी आणि शिक्षणाच्या बळावर त्यांनी लातूर येथीलयशवंतराव चव्हाण ग्रामीण रूग्णालय व एम.आय.टी.जनसंवाद महाविद्यालयात जनसंपर्क अधिकारी तथा अधिव्याख्याता या सन्मानाच्या पदांवर कार्य केले. आपल्या कार्याचा विस्तार होतांना बापूंना २०११ साली जिल्हा परिषद लातूर येथे माहिती, शिक्षण, संवाद (प्रचार-प्रसिद्धी), जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक या पदाची संधी चालून आली. बहुआयामी, अष्टपैलू व्यक्तिमत्वाची रुजवणूक झालेल्या उद्धवबापूंनी या संधीचे सोने केले आणि त्यानंतर मात्र त्यांनी मागे वळून पहिलेच नाही! आपल्या साच-मवाळ-मधुर वाणीने आणि प्रेमळ वागण्याने उद्धव बापूंनी आपल्या कार्यालयातील सेवकांपासून ते कलेक्टर साहेब, पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषद अध्यक्ष साहेबांपर्यंतच्या सर्वच प्रशासकीय-राजकारणी लोकांच्या मनात आपले अभ्येद्य स्थान निर्माण केले!

आपली प्रशासकीय जबाबदारी इमानेइतबारे सांभाळतांना उद्धव बापूंनी आपल्या आवडीच्या कार्याला पूर्णविराम दिला नाही. सातत्याने आपला परीघ विस्तारण्याचे काम चालूच ठेवले. आपल्या गावातील कीर्तन-प्रवचन परंपरा पुढे चालू ठेवतांना ग्रामीण भागात सामान्य लोकांचे प्रबोधन झाले पाहिजे ही मनातील तळमळ त्यांनी आपल्या व्याख्यानातून लातूर जिल्हाभरच काय संपूर्ण महाराष्ट्रभर रुजवली. 'ज्ञानदीप लावू जगी' या संत नामदेव उक्तीचा बोध घेऊन बापूंनी आपला ज्ञानरथ ज्ञानोबा-तुकोबांच्या मार्गाने अखंड चालूच ठेवला. आधुनिक लोकप्रबोधक, कृतीशील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, राष्ट्रसंत गाडगेबाबा यांचा आदर्श बापूंना स्वस्थ बसू देत नव्हता! ग्रामशक्तीतून राष्ट्रभक्ती, तुझं गावंच नाही का तीर्थ?, आदर्श गाव स्मार्ट गाव, जल है तो कल है, स्वच्छता हिच खरी सेवा, बोलाल तर जिंकाल, हे जीवन सुंदर आहे, युवा शक्ती-राष्ट्र भक्ती, वृक्षवल्ली आम्हा सोयरी, संवाद कौशल्य, व्यक्तिमत्व आणि नेतृत्व विकास आदि आणि अशा विविधांगी विषयावर महाराष्ट्रभर व्याख्याने-प्रवचने देऊन समाजाचा तळ ढवळून काढण्याचे महत्कार्य बापूंनी आत्तापर्यंत केले आहे! याच्या जोडीला बापूंनी तुकाराम गाथा-ज्ञानेश्वरीवर अनेक प्रवचने करून आपला वारकरी व्यासंग लोकाभिमुख करत जागृतीचे अखंड कार्य सुरूच आहे! याचाच परिपाक म्हणजे बापूंना यशदा पुणे, एन.आर.डी.ए.हैद्राबाद, आय.एम.सी.नवी दिल्ली सारख्या नामवंत संस्थानी व्याख्यानासाठी बोलावले असून तिथेही त्यांनी आपला ठसा उमटवला आहे! आपला प्रेमळ स्वभाव, उत्तुंग कर्तृत्व आणि वक्तृत्वाच्या बळावर हा माणूस गल्लीपासून दिल्लीपर्यंत पोहोचला आहे!

याशिवाय उद्धवबापू फड एक व्यासंगी लेखक सुद्धा आहेत. व्यसन मुक्ती, पंढरीची वारी, हागणदारीमुक्त गाव, ग्राम स्वच्छता, पाणंदमुक्त गाव, महाराष्ट्रातील तमाम संतांच्या चरित्र आणि अभंगावर उद्धव फड सातत्याने लिहित असतात. उद्धव फड हे केवळ लेखन-भाषण करून बोलके समाजसुधारक नसून ते कर्ते सुधारक आहेत. गावोगाव जाऊन त्यांनी स्वतः खराटा हातात घेऊन गावं स्वच्छ केली आहेत. याचाच परिपाक म्हणजे आत्तापर्यंत त्यांना चार-पाच वेळा महाराष्ट्र शासनाने स्वच्छता दूत म्हणून सन्मानित केले आहे. यातच त्यांनी ग्रामीण भागातील महिला जागृतीसाठी 'पॅडमॅन' हा चित्रपट दाखवून कृतीशील जागरण केले. या सर्वच कामांचा कळस म्हणजे उद्धव फड हे मागील २०१२ पासून सलग महाराष्ट्र शासनाच्या पंढरपूर वारीचे नेतृत्व करत असून वारीत त्यांचे प्रबोधनाचे काम जोरात चालू असते आणि आजही चालू आहे! पंढरीच्या वारीत उद्धव फड हे ग्रामीण, शेतीमातीतील लोकांचे प्रबोधन करतांना सौचालय वापर, पाणी बचत, स्वच्छता आदि विषयांवर प्रबोधन करतांना आपला वारकरी वसा-वारसा मोठ्या ताकदीने चालवत आहेत! बहुअंगी, बहुआयामी, व्यासंगी व्यक्तिमत्व असलेल्या संवाद तज्ञ श्री उद्धवबापू फड यांचा आज वाढदिवस! त्यांना आपल्या सर्वांगीण कार्यात त्यांना आणखी काम करायला शंभर हत्तीचे बळ मिळो! त्यांची कीर्ती, यश, कर्तृत्व आणि वक्तृत्व दिगंतराला जावो! त्यांच्या वक्तृत्वाने तमाम महाराष्ट्र आनंदी-सुखी-समाधानी होवो! त्यांच्या मुखावाटे सुमधुर बोल प्रसवून लोकपंढरीच्या या कृतीशील वारकऱ्याला उदंड आयुरारोग्य लाभो हीच पांडुरंग चरणी विनम्र प्रार्थना!



# कायम जमिनीवर पाय असलेले माझे सन्मित्र

आधुनिक केसरी

**सन्मित्र मंगेश चिवटे यांचा माझा परिचय साधारणतः दशकभरापूर्वीचा. मुंबईतील एका प्रतिष्ठित वृत्तवाहिनीचे विशेष प्रतिनिधी असताना गोवा राज्याचे तत्कालिन मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर यांच्या मुलाखतीसाठी राजधानी पणजीत मंगेश आले होते. मी पर्रीकर साहेब संचालक असलेल्या गोवादूत दैनिकात वरिष्ठ उपसंपादक पदावर कार्यरत होतो. त्यावेळी सचिन परब सर गोवादूतचे संपादक होते. परब सरांनी त्यांची ओळख करून दिली. तेंव्हापासून आजतागायत निखळ मैत्री टिकून आहे.**



पुढे पत्रकारिता सोडल्यानंतर मंगेश चिवटे यांच्यावर महाराष्ट्राचे तत्कालिन नगरविकास मंत्री, तथा विधमान मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी शिवसेना वैधकीत मदत कक्षाची जबाबदारी दिली. या काळात आमची मैत्री अधिक दृढ होत गेली. कोरोना काळात आमच्या विनंतीवरून बीड जिल्ह्यात अनेक शिबिरे घेतली. शेकडो पत्रकारांना प्रथमोपचार किट वितरीत करून सामाजिक बांधिलकी जपली. मी करत असलेल्या सकारात्मक पत्रकारितेचा मंगेशजीना नेहमीच मित्र या नात्याने अभिमान वाटतो. चांगल्या कामाचे मनापासून कौतुक करणे हे त्यांचे स्वभाव वैशिष्ट्य आहे. त्यातूनच माझ्यासारख्या अनेकांना त्यांनी प्रोत्साहन दिले आहे. प्रसंगी संधी दिली आहे. शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या राज्य पातळीवरील कोविड योद्धा सन्मानासाठी माझी निवड केली. सर्वदूर, सर्वव्यापी हे ब्रिद घेऊन प्रसिध्द होत असलेल्या लोककल्याणकारी आरोग्यदूत मासिकाची संकल्पना मंगेशजी यांचीच आहे. मुंबईच्या मायानगरीत सतत मीडियाच्या गराड्यात असतानाही माझ्यासारख्या बीड जिल्ह्यातील ग्रामीण पत्रकाराकडे आरोग्यदूतच्या संपादकपदाची धुरा सोपवली, यातच त्यांचे मोठेपण दिसून येते. दुसऱ्याच्या आनंदात आनंदी राहणारा हा अफलातून माणूस माझा जवळचा मित्र, माझा खरा हितचिंतक, माझा योग्य मार्गदर्शक आहे, याचे भूषण वाटते. राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांचे ओएसडी, मुख्यमंत्री वैधकिय कक्षाचे प्रमुख अशा महत्वपूर्ण पदावर असतानाही त्यांचे पाय कायम जमिनीवर आहेत. कुठल्याही प्रकारचा गर्व नाही, स्वच्छ पाण्यासारखे त्यांचे जगणे आहे. अशा या निगर्वी, दिलदार सन्मित्र यांचा 15 जुन हा वाढदिवस. त्यानुषंगाने त्यांना उदंड आयुष्य लाभो, हीच मनोकामना.

**बाबा श्रीहरी देशमाने**
**संपादक, आरोग्यदूत**



# पनवेल पोलिसांचा आदर्श निर्णय

आधुनिक केसरी

भाडेकरुंची नोंद पोलीस ठाण्यात केली नसल्यास भाडेकरुने गुन्हा केल्यानंतर घरमालकाविरोधात पोलीस कारवाई करतील असा इशारा पनवेल शहर पोलीस स्थानकाचे पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांनी दिला आहे तो निर्णय जनतेसाठी निश्चितच स्वागतार्ह म्हणावा लागेल आज महाराष्ट्रातील अनेक शहरांची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. विविध उद्योगधंद्यासाठी, नोकरी अन्य कामासाठी बाहेरच्या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात लोक शहरांमध्ये दाखल होत आहेत स्थानिक घरमालकांना अथवा नागरिकांना कोणत्याही प्रकारची त्यांच्याबद्दल अधिकृत माहिती नसते. आपल्याला भाडे मिळते म्हणून अनेक घरमालक त्यांना भाडेकरु म्हणून ठेवून घेतात मात्र त्यांनी कोणताही अनुचित प्रकार, गुन्हा केला तर पोलिसांना त्याचा शोध घेणे अडचणींचे ठरते तसेच सद्या काही दिवसांसाठी घरे घेवून राहणाऱ्यांपैकी अनेकांकडून महानगरात सातत्याने गुन्हेगारी स्वरुपाची कृत्ये होताहेत. अनेक घरांचा गैरवापर देहविक्रीसाठी तसेच तस्करीतून आणलेले सोने,चांदी, अफू,चरस, मारिजुआना, गांजा, एल,एस,डी सारखे पदार्थ साठवण्यासाठी घरांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात असल्याचे घडलेल्या अनेक घटनांवरुन समोर आले आहे असली गैरकृत्ये उधळून लावण्यासाठी पनवेल शहर पोलीस स्थानकांने घेतलेला निर्णय निश्चितच कौतुकास्पद आहे.

**राजू जाधव, मांगूर, जि.बेळगाव**

# दस्तुरखुद्द : अस्वस्थ मनाचे चित्रण : डॉ. शिवाजी पाटील

आधुनिक केसरी

**डॉ. रवींद्र ठाकूर यांचा १९८१ मध्ये प्रकाशित झालेला 'अनिकेत' हा पहिला कवितासंग्रह. त्यानंतर २००४ मध्ये प्रकाशित झालेला 'दस्तुरखुद्द'. परंतु 'दस्तुरखुद्द' मध्ये आणखी नव्याने कवितांचा समावेश होऊन नव्या रूपात दुसरी आवृत्ती २०२३ मध्ये अभिरुची पब्लिकेशनच्या वतीने प्रकाशित झालेली आहे. वाचकांना एकूण व्यवस्थेचा पुनर्विचार करावयास भाग पाडणारी धीट कविता म्हणून या संग्रहाकडे पाहता येईल. कादंबरी व समीक्षालेखनात झोकून देणाऱ्याठाकूर यांचा मूळचा पिंडकविमनाचा आहे. मंदावलेल्या काव्यलेखनास पुन्हा एकदा धुमारे फुटत असल्याची खूण म्हणजे प्रस्तुत कवितासंग्रह आहे, असे म्हणता येईल. या संग्रहातील कविता अवतीभोवतीच्या वास्तवाचे भान जागवणारी आहे. कधी ओवीतून, कधी गझलेतून पण विशेषतः मुक्तछंदातून अविष्कृत झालेले आशयविश्व सर्व मानवसमूहाच्या समस्यांभोवती केंद्रित झालेले दिसून येते.**

एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी जागतिकीकरण, खाजगीकरण व मुक्त अर्थव्यवस्थेच्या गदारोळात मानवताधर्म हरवत चालल्याची खंत अस्वस्थ करते. या ठिकाणी थोरांच्या विचारांचा पराभव करणारा कृतघ्न माणूस दिसतो, जाती-धर्माचे राजकारण करणारा ढोंगी नेता दिसतो, कलाशून्य असलेल्या साहित्यिकांना सन्मान देणारी व्यवस्था दिसते, निष्क्रिय बुद्धिवादी वर्गाचा आढळ दिसतो, तेव्हा सामान्यांच्या वाट्याला जाचक भूतकाळ आणि अस्वस्थ भविष्यकाळ याशिवाय काय आहे ? बिरदेवाच्या भगताने सांगितलेली 'भाकणूक' म्हणजे जीवनाच्या विविध आघाड्यावर झालेला पराभवच आहे, सद्यःस्थितीत निसर्ग आणि मानव यात कोणताच समतोल दिसत नाही.कवी लिहितो,

**समदं जळून व्हईल, पण तेच्यातून नवं जल्माला ईल**
**धरणी माता धुमसाय लागलीया, कोन तिच्या जीवाचं**
**जानील ? भूकंला घास, तान्हला पानी, आपनच आपला**
**तारनहार व्हईल आईला आई, भनीला भन, मानसाला मानूस**
**म्हणत जाईल.**

निसर्ग व मानव यांच्यातील असमतोलामुळे ग्लोबल वार्मिंग सुरू झाले आहे. हिवाळ्यात पाऊस, उन्हाळ्यात थंडी असे ऋतुचक्र बदलत आहे. नफ्याची प्रेरणा आणि शोषणाची हत्यारे यांनी समाजजीवनात तीव्र संघर्ष निर्माण केला आहे. जगायला पोषक वातावरणाचा अभाव आहे. तंत्रज्ञानाच्या विकासाबरोबर रोगराईत वाढ झाली. त्यातच साम्राज्यवादी धोरणामुळे श्रीमंत आणि गरीब या वर्गातील अंतर वाढत चाललेले दिसते. "माणसाने दूरदृष्टी दाखवून वेळीच थांबायची क्षमता गमावली आहे. तो पृथ्वीचा विनाश करूनच थांबेल." असे अल्बर्ट श्वाईत्सरने म्हटले होते. त्यातून घेण्याच्या इच्छाशक्तीच्या अभावातून येणाऱ्या दुष्परिणामास सामोरे जावे लागणार आहे. असा इशारा निरक्षर व आधुनिकतेचा स्पर्श नसलेला बिरदेवचा भगत देतो. पुरोगामी विचारसरणी दीन-दलित, पीडित माणसाला न्याय देणारी आहे. परंतु गढूळलेल्या समाजजीवनात पुरोगामी कोण ? आणि प्रतिगामी कोण ? हाच प्रश्न अस्वस्थ करतो. अशा ढोंगी आणि कावेबाज समूहांना वठणीवर आणणे महाकठीण आहे. ही अगतिकता शिवी देण्यापलीकडे जात नाही. कुणालाही दोष न देता आता सारे नव्याने तपासून घेण्याची भूमिका कवी ठामपणे घेतो. भले मग एखादी शिवी स्वतःलाही हासडून पाहिली पाहिजे. असे सांगून स्वतःलाही तपासण्याचे निर्देश कवी देतो.

समाजात बोल घेवड्या माणसांची संख्या वाढत चालली आहे. प्रतिगाम्यांच्या खांद्यावर पुरोगामी पताका असल्यामुळे आकलनाच्या पलीकडील परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा ढोंगी माणसांचा बुरखा पाडण्याचे अस्सल काम ही कविता करते. 'शिवी देण्यापलीकडे' या कवितेत कवी लिहितो,

त्या थोतांड्यांशी मला हात मिळवायचे नाहीत
**मनुस्मृती डोक्यात ठेवून**
**ते मनुस्मृतीविरुद्ध बोलतात.**
**त्यांच्या घोषणांवर माझा विश्वास नाही**
**स्टेजवरून खाली उतरले की**
**ते वेगळंच बोलतात**

'काजवे' या कवितेतील या दोन ओळी जळजळीत वास्तवावर प्रकाश टाकतात.

**प्रतिसूर्य म्हणवणारे काजवे निघाले**
**जातिवंत पुरोगामी मनुचे दास निघाले**

बुद्धिवादी, परिवर्तनवादी आणि प्रसारमाध्यमे यांच्यावर सनातन्यांनी मात केलेली आहे. त्यांची जाचक व्यवस्था अधिक बळकट होतानाकवीला दिसते आहे, पण दुसऱ्या बाजूला ज्यांच्यावर गुलामी लादल्याचा पत्ता नसलेल्या लोकांसमोर सत्य सांगणेही अवघड आहे. अशा कात्रीत सापडलेल्या जागरूक मनाची कोंडी झालेली आहे. तरीही तळागाळातल्या माणसासाठी'जाळीत झोपलेल्या वनराजाची' प्रतिमा योजून आशावाद जागविलेला आहे.

'एक संवाद' या कवितेत समाजात जरातरी माणुसकी शिल्लक राहिलेली आहे काअसा प्रश्न कवीला पडतो. गरिबीतसुद्धा माणसाला माया होती. भाकरी वाटून खाऊन लोक आल्या परिस्थितीला तोंड देत होते. एका तीळाचे तुकडे करून खाणाऱ्या सातभावांची गोष्ट एकमेकाला सांगायचे. पोरांनी खाऊन टोपल्यात काहीच उरले नाही म्हणून पोटभरून पाणी पिऊन झोपी जाणारी माय होती. एकमेकांसाठी उपास काढणारी माणसे होती. निसर्गानेच जगण्याची ताकद दिली होती. माणसाला माणुसकी होती. झाडाला सावली आणि नदीला पाणी होते. पण आधुनिकीकरणामुळे विश्व जवळ आले. खेडे ग्लोबल झाले. परंतुमाणसं मात्र माणसांपासून दूर गेली. हे सर्व काही कळायच्या आतच झाले. माणसातली माणुसकी आटली. 'क्षितिजापल्याड' या कवितेत सामान्य माणसाला भयभीत करणारा भोवताल खिन्नता पसरवणारा आहे, असे चित्र उभे केलेले दिसते. तर निसर्गाची कुरूपतेकडे होणारी वाटचाल यांत्रिकीकरणाचे द्योतक आहे, असे 'गिरणा' या कवितेमध्ये कवी सांगतो.




पद्धतशीरपणे पोसल्या जाणाऱ्या गुलामीचे चित्र 'गुलामगिरी' कवितेत आढळते. तर आपल्या कित्येक पिढ्या मातीत घालायला सज्ज असणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध रोखठोक बोलणारा कवी होशियार राहण्याचे आवाहन 'आलबेल होशियार' मध्ये करतो.मूळ मानवी निसर्गाधिष्ठित समाजव्यवस्था खिळखिळीकरण्याचा उद्योग काहींनी आरंभला आहे. 'सगळे साले बाराचे निघाले' या कवितेत आधी आलेले काय आणि नंतर आलेले काय मूळया सर्वांनी या समाजव्यवस्थेला सुरुंग लावला अशी टिपणी केली आहे. तुझे माझे करीत त्यांनीसगळी जमीन बळकवली. आपलाच आहे म्हणून समुद्र वाटून घेतला. समाजाच्या नावाखाली गावांचे पुंजके तयार केले. देवधर्माच्याआणि जाती-पंथांच्या नावाखाली विषमता निर्माण केली. संघर्ष सतत जिवंत ठेवण्याचे काम केले. कोणालाही माणूस म्हणून जगण्याची सोय ठेवलेली नाही, असेही नाईलाजाने कवीला म्हणावे लागते. सामाजिक परिवर्तनाच्या नावाखाली जुन्याच गोष्टी नव्याने येत राहतात. जात गेली समाज आले. जातीचे नवे नामकरण झाले. अशा बिघडलेल्या समाजवास्तवाचे सूक्ष्म निरीक्षण अत्यंत बोलके आहे. संस्कृतीच्या नावाखाली जुना जातीयवादच पोसला जात असताना दिसतो. त्या दृष्टीने 'कुठे काय बदलले ?'ही कविता चिंतनीय आहे.

'म्हण ...भारत माझा देश आहे' या विंडबनात्मक कवितेतून सामान्यांच्या स्थितीगतीचे मानसिक चित्र उभे केलेले आहे. या कवितासंग्रहाच्या शेवटी दत्ता हलसगीकर यांनी या कवितेवर लिहिलेला आणि प्रकाशित झालेला लेख दिलेला आहे. त्यात ते म्हणतात, "डॉ. रवींद्र ठाकूर यांच्या कवितेतला विद्यार्थी आजच्या संभ्रमित, शापित, विचारभष्ट्र पिढीचा प्रतिनिधी आहे. सभोवताली जे काही चालले आहे त्याचा ही कविता म्हणजे आरसा आहे. या आरशातलं चित्र बदलणं हे आता तुमचं आमचं जबाबदारीचं कर्तव्य आहे. वर्तमान काळातल्या जीवघेण्या परिस्थितीत सापडलेल्या अस्वस्थ मनाचे चित्रण 'दस्तुरखुद्द' मधील कवितांतून उलगडत जाते. डोळे दिपतील अशा भौतिक सुधारणा होत आहेत परंतु माणसाच्या तुटलेपणाची संवेदना सतत छेडत राहते. काय केले म्हणजे माणसासारखे माणसे वागतील ? अशा प्रश्नांच्या अनुषंगाने कविमन अंतर्मुख होते. बिघडलेल्या सामाजिक - राजकीय जीवनावर केवळ बोलून आता उपयोग होणार नाही, त्यासाठी आपापल्या क्षमतेनुसार प्रत्यक्ष काहीतरी करण्याची वेळ आलेली आहे. या दृष्टीने 'जमलं तर एखादी शिवी' ... हीकविता वैशिष्ट्यपूर्ण असून परिवर्तनवादी चळवळीतला महत्त्वाचा टप्पा मांडणारी आहे. सर्वच पातळ्यांवर सुरू असलेला सर्वभक्षक राक्षसी विनाशहे एक ज्वलंत सामाजिक वास्तव झालेले आहे. याचे वस्तुनिष्ठ चित्रण करणारी कितीतरी कविता आज लिहिली जाते आहे परंतु ठाकूर यांची कविता केवळ वास्तव मांडून न थांबता आशावादाची सूक्ते गाणारी दिसून येईल.'जमलं तर एखादी शिवी' या कवितेत कवी लिहितो,

**"दोष माझा नाही, दोष**
**तुझा नाही याचा नाही, त्याचा नाही**
**हे आता थांबवूया सारं नव्यानेच तपासून घेऊया**
**याला त्याला बोल लावण्यात तरी काय मतलब आहे**
**एखादा बोल स्वतःलाही लावून घेऊ या."**

स्वतःची बलस्थाने व मर्यादा ओळखून परिवर्तन चळवळीची दिशा निश्चित करण्यासाठी सजगता ठेवण्याचे आश्वासन ही कविता देते. इथले निमिषात रंग बदलणारे सरडे व त्यांची स्ट्रॅटेजी या विरुद्ध लढण्यासाठी उदयाला येणाऱ्या चळवळी मोडीत निघण्याची शक्यता अधिक असल्यामुळे ही कवितासावधगिरीचा इशारा देते.

भविष्यात कदाचितक्षणोक्षणी आकार बदलणारे पांढरे ढग व आकाशाची निळाई पाहता येणार नाही म्हणून ते क्षण कवितेच्या चिमटीत पकडून ठेवावे असे कवीला वाटते. झाडासारखेच माणसांचे होत असलेले बोन्साईकरण म्हणजे मध्यमवर्गीय समाजाच्या संकुचित प्रवृत्तीचे द्योतक आहे. परंतु आपणच निर्माण केलेल्या दुःखात होरपळून निघणाऱ्या माणसांना आश्वासक स्वर देणारी ठाकूर यांची कविता आहे. त्याचबरोबर आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे सामाजिक प्रश्नांची उकल करण्याची तऱ्हा कवीला चक्रावून सोडते. भारतीय संस्कृतीच्या सनातनी व्यवस्थेचे गोडवे गाणाऱ्या भाडोत्री भाटांची संख्या येथे थोडी का आहे ?यंत्रयुगएवढे पुढे गेले पण समस्या हाताळण्याची आमची रीत इतकी विचित्र आहे की समस्या सुटण्याऐवजी त्यात अधिक गुंता होत जातोय. जातीच्या उतरंडी रचणारेच अध्यात्मिक समतेवर सतत बोलत असतात. आंबेडकरांचे परिशिष्ट वगळण्याची सूचना करून विचारस्वातंत्र्य राखल्याची फुशारकी मानणारे इथलेच आहेत. थोरांची नावे घेत दलित - आदिवासींच्या वस्त्या जाळल्या जात आहेत. देशभक्तीच्या नावाखाली जातीधर्माच्या राजकारणाला ऊत आलाय. अशा परिस्थितीत शेतकऱ्याला 'या परीस विंग्रज सरकार लय बेस होतं' असे वाटायला लागते.म्हणजेच तळागाळातल्या माणसांच्या प्रश्नाला हात न लावता पुढारी म्हणून जगण्यासाठी नव्यानेच प्रश्न निर्माण करणारी ही व्यवस्था कवीच्या वेदनेचा विषय बनते. माणसांमधले श्वापदपण दाखवितानात्यांचे शब्द कुठेही कचरत नाहीत किंवा हताश होत नाहीत. नव्या नेतृत्वाची गरज प्रकर्षाने संसूचित केली जाते.

प्रतीक आणि प्रतिमा यांचा आढळ ठाकूरांच्या कवितेत फारच अल्प प्रमाणात दिसून येतो. 'झाडाची कहाणी' मध्ये येणारी झाडाची प्रतिमा विलक्षण ठरणारी आहे. विशेष म्हणजे त्यांची कविता वाचताना बुचकळ्यात टाकणाऱ्या दुर्बोधतेपासून दूर आहे. सामाजिकतेच्या नावाखाली शब्दबंबाळही होत नाही. ती वाचकांच्या मनाला सरळ भिडणारी आहे. कवितेत नियमोल्लंघन येते ते अगदी अपरिहार्य भाग म्हणून. तंबाखूचा बंबाकू होणे, डोंगराचा भोंगर होणे, माणसाचा कानूस होणे इत्यादी मधील बंबाकू, भोंगर, काउस, कानूस हा रुपस्तर केवळ अभ्यस्त नसून बदल होत जाणाऱ्या कुरूपतेचे हुबेहूब चित्र उभे करण्यासाठी राबवलेला आहे. 'तेव्हा' रूपापूर्वी 'जेव्हा' येणे, 'तसं' पूर्वी 'असं' येणे किंवा 'तर' पूर्वी 'जर' येणे, हे व्याकरणातील संकेत झुगारलेले आहेत. त्यांच्या कवितेची शैलीचिकित्सा स्वतंत्रपणे मांडण्यासारखी आहे. 'पिकांची कथा' ही पूर्ण कविता बोलीचे दर्शन घडविते. बोलीतील अनेक शब्दांचा आविष्कार इतरत्रही आढळून येतो. तीन तेरा होणे, सात गेले पाच उरणे इत्यादींसारख्या संख्यात्मक वाक्प्रचारांचा खूबीदार उपयोग केलेला आहे. "विविध प्रकारच्या जाणिवांनी आणि निरनिराळ्या परीच्या आविष्कारशैलींनी गजबजून गेलेल्या आजच्या मराठी कवितेत आपला स्वतंत्र आवाज जपणाऱ्या कवितेचा विचार करताना रवींद्र ठाकूर यांचा निर्देश अपरिहार्य ठरतो." हे मलपृष्ठावरील विधान निश्चितच सार्थ आहे याबद्दल शंकाच नाही.अभिरुची पब्लिकेशन्सने प्रकाशात आणलेल्या या नव्या रूपातील देखण्या संग्रहाचे वाचकांकडूननिश्चितच स्वागत होईल, याबद्दल तीळमात्र शंका नाही.



# धार्मिक वाद निर्माण करणारे ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** ०२जून रोजी रात्री नेर येथील दरबाई मस्जीद येथे कोणीतरी अज्ञाताने मुस्लिम धर्मियांचे पवित्र उपासनास्थान मस्जिद मध्ये मेलेले डुक्कर फेकून उपासनास्थान अपवित्र करून मुस्लिम धर्मियांचे भावना दुखावल्या म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला होता सदर आरोपींना ताब्यात घेतले आहे. नदीला लागून असलेल्या झुडपात झोपेत असलेले डुक्कर यातील मुख्य आरोपी भीमराव कुंवर याने दमडाचे सहायाने एका फटक्यात मारुन डुक्कर एका गोणीमध्ये आरोपींनी टाकून सदरचे डुक्कर नेर येथील दरबाई मस्जीदचे बाजूस असलेल्या किराणा दुकानाचे गच्चीवर जाऊन दरबाई मस्जीदमध्ये फेकुन दिला असल्याची गुन्हयाची कबुली दिली आहे. दत्तात्रय शिंदे यांचे पथकातील तपास अधिकारी सपोनि. विलास ताटोकोंडलवार, मा.अनिल महाजन, प्रविण पाटील, रविंद्र माळी,प्रमोद ईशी, पोना मुकेश पवार, ज्ञानेश्वर गिरासे, अमोल बोरसे, विनायक खैरणार, विनोद गांगुर्डे, अमोल कापसे, नितीन दिवसे, कांतिलाल शिरसाठ, रविद्र सोनवणे, राकेश मोरे, धिरज सांगळे, कुणाल शिगाणे, पोशि प्रमोद पाटील यांचे पथकाने गुप्त बातमीदारामार्फत यातील अज्ञात आरोपीतांचा कौशल्यपूर्ण तपास करून शोध घेतला असता संशयित आरोपी गणेश छोटु शिरसाठ यास पुणे एम आय डी सी येथून ताब्यात घेण्यात आले व त्यांचेकडे संशयावरुन कसुन आणि सखोल विचारपुस केली असता त्यांने सदरचा गुन्हा त्याचे इतर साथीदार भीमराव सुकलाल कुंवर,विकी नाना कोळी, रोहीत अरुण जगदाळे, अल्पवयीन विधी संघर्ष बालक यांचेसह करण्या संबंधी कट रचला सदरचा गुन्हा हा आरोपींतांनी जुन्या भांडणाच्या कारणावरुन सदरचे गुन्हेगारी कृत्य केलेले असल्याचे तपासात निष्पन्न झालेले आहे. सदरची कारवाई धुळे तालुका पोलीस स्टेशन तपास पथकाने संजयजी बारकुंड साहेब मा. पोलीस अधीक्षक सो. धुळे, किशोरजी काळे सो. मा. अपर पोलीस अधीक्षक सो, धुळे, साजन सोनवणे सो मा. उप विभागीय पोलीस अधिकारी सौ. धुळे ग्रामिण विभाग साकी यांचे मार्गदर्शनाखाली केली असून आरोपीतांबाबत कोणतीही माहिती नसतांना गुन्हे तपासाचे शास्त्रोक्त तंत्र आणि कौशल्यपूर्व तपासाचे जोरावर सदरचा गुन्हा उघडकीस आणल्याने वरीष्ठांनी पथकांचे कौतुक केले आहे व या कामगिरीबद्दल १५ हजाराचा बक्षीस जाहीर केले आहे.

# चुकीचे उपचार केल्यामुळे भिवंडीत चिमुकलीचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**भिवंडी :** भिवंडी शहरात एका खाजगी रुग्णालयात उपचार घेत असलेल्या चार वर्षीय चिमुरडीचा चुकीचे उपचार केल्यामुळे निधन झाले आहे. चिमुरडीच्या मृत्यूस डॉक्टर, परिचारिका, रुग्णालय व्यवस्थापक जबाबदार धरत संतप्त नातेवाईकांनी रुग्णालयाची तोडफोड केली. तसेच डॉक्टर परिचारिका यांना मारहाण करण्याची घटना घडली आहे. मुलीच्या मृत्युने कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

भिवंडी शहरातील भंडारी कंपाऊंड येथे सनलाईट हॉस्पिटल आहे. राम नगर परिसरात राहणारे नितीन कांबळे यांची चार वर्षीय मुलगी श्रद्धा हिला उलट्या होत असल्याने उपचारासाठी दाखल केले होते. रात्री आठ वाजताच्या सुमारास श्रद्धा हीची प्रकृती बिघडल्याने डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार श्रद्धाला सलाईनमधून इंजेक्शन देण्यात आले.त्यानंतर श्रद्धा बेशुद्ध पडून निपचित झाली व त्यानंतर डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. हे कळताच रुग्णालयात असलेल्या श्रद्धाच्या नातेवाईकांनी तांडव सुरू केला .त्यानंतर तेथे जमा झालेल्या नातेवाईकांनी हॉस्पिटलची तोडफोड करत डॉक्टर परिचारिकेला मारहाण केली आहे.

या घटनेची माहिती मिळताच स्थानिक भोईवाडा पोलिस ठाण्यातील पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी नातेवाईकांची समजूत काढून परिस्थिती आटोक्यात आणली व त्यानंतर श्रद्धाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात रवाना करत अकस्मात मृत्यूची नोंद केली. डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मुलीचा मृत्यू झाला आहे. इंजेक्शनचे तीन डोज लागोपाठ दिल्यामुळे मुलीचा मृत्यू झालाय अशा आरोप नातेवाईकांनी केलाय तसेच डॉक्टरांवर कायदेशीर कारवाही करण्याची मागणी कुटुंबीयांनी केली आहे. तर रुग्णालयात तोडफड प्रकरणी डॉक्टरांनी नातेवाईकांच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून भोईवाडा पोलीस या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करत आहेत. अद्याप रुग्णालयाकडून कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही.




# रक्तदान दिनानिमित्त वैजापुरात रक्त तपासणी, रक्तदान माहिती मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** सर्वात श्रेष्ठ दान रक्तदान आहे,"रक्तदान श्रेष्ठ दान," रक्तदान केल्याने कोणतीही शारीरिक हानी नाही,रक्तदानाने एखादया व्यक्तीचे प्राण वाचू शकतात,रक्तदान केल्याने एखाद्या व्यक्तिला नव्याने जीवन जगता येऊ शकते यासाठी सामाजिक बांधिलकी जपत समाजातील पात्र व्यक्तींनी स्वेच्छेने रक्तदान करून समाजाचे ऋन फेडावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी जे,के,जाधव महाविद्यालयात वैजापूरच्या महालॅबने आयोजित रक्त तपासणी , रक्तसंकलन व रक्तदान कार्यक्रमात रक्तदात्याना मार्गदर्शन करताना मंगळवार( ता,१३ )रोजी केले, जागतिक रक्तदान दिन निमित्त हा कार्यक्रम महालॅब वैजापूर द्वारा आयोजित करण्यात आला होता,आज देशाला रक्ताची नितांत गरज आहे,ती रक्तदात्यानी रक्तदान करून पूर्ण करावी असे आवाहन राजपूत यांनी केले,या प्रसंगी महालॅब चे सर्वश्री शुभम तुसे, प्रदीप-वाघचौरे,भरत आल्हाट, रक्तदाते प्रशांत गायकवाड,प्रकाश सोनवणे,दिग्विजय पाटील,स्वाती शिंदे,किरण टूपके यांच्या शिवाय पंकज साळुंके,नितीन गायकवाड, किशोर पठारे रक्तदाते उपस्थित होते,

# सोयगाव तालुक्यात दर कमी असले तरी शेतकऱ्यांचा यावर्षीही सोयाबीनकडेच कल

आधुनिक केसरी न्यूज



**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात पेरणीपूर्व मशागतीला वेग आला असून, शेतकऱ्यांच्या घरात मागील एक वर्षांचे सोयाबीन विक्रीविना पडून असतानाही यावर्षीही शेतकरी सोयाबीनची पेरणी करण्याच्या मनस्थितीत आहेत. सध्या बाजारात बियाणे, खतांची दुकानांत मोठी गर्दी वाढत असून, पाऊस झाल्यावरच पेरणी होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागल्या आहेत. गेल्या काही दिवसांपासून लग्नसराईत गुंतलेला शेतकरी जाता शेतीच्या मशागतीकडे वळला आहे. आहे. नांगरणी, पखरणी, काडीकचरा वेचणे, शेणखत टाकणे आदी कामामध्ये शेतकरी व्यस्त झाला आहे. त्याचबरोबर शेतीची सर्व कामे एकाच वेळी आल्याने व मजूरीचे दर वाढल्याने अनेक शेतकरी यंत्रांच्या साहाय्याने शेतीकामे करण्यास प्राधान्य देत आहेत. ट्रॅक्टरच्या साहाय्याने वखरणी, नांगरणी कमी वेळात आणि अधिक परिणामकारक होत असल्यामुळे ट्रॅक्टरद्वारे मशागत करण्याला शेतकऱ्यांची पसंती मिळत आहे. यंदाचा उन्हाळा अतिशय कडक असल्याने शेतकरी पावसाची वाट पाहत होता. अल्पभूधारक शेतकऱ्यांना बैलजोडी ठेवणे परवडत नसल्याने त्यांचा कल ट्रैक्टर कडे वाढलेला आहे. त्यामुळे ट्रॅक्टर मालकांना सुगीचे दिवस आले आहेत. परंतु काही शेतकरी मात्र अजूनही पारंपरिक पद्धतीने बैलजोडीच्या साहाय्याने शेतीची कामे करण्यास प्राधान्य देत आहेत. तालुक्यातील क्याच शेतकऱ्यांची पेरणीपूर्व मशागत आटोपली आहे. सोयाबीनच्या दरात मागील एक वर्षापासून कुठलीही दरवाढ झाली नसल्याने अनेक शेतकऱ्यांच्या घरामध्ये मागील एक वर्षांपासून सोयाबीन विक्रीविना पडून आहे, तरीही शेतकरी सोयाबीन पीक परत घेण्यांच्या तयारीत आहेत बाजारात सोयाबीनच्या बियाण्याचे अनेक जातीचे बियाणे दुकानदारांनी मोठ्या प्रमाणात खरेदी करून ठेवले आहेत प्रत्येक दुकानदाराने त्याच्या दर्शनी भागासमोर दुकानात उपलब्ध असलेल्या वेगवेगळ्या जातीचे बियाणे समोर लावून ठेवले आहेत. त्यामुळे यंदा बियाणांची कोणतीही अडचण येणार नसल्याचे सोयगाव कृषी विभागाचे कृषी सहाय्यक मानसिंग भोळे सांगत आहेत. तर अनेक शेतकऱ्यांकडे मागील वर्षाचे सोयाबीन बियाणे घरीच असल्याने तेच वापरण्यात यावे असे कृषी सहाय्यक मानसिंग भोळे सांगत आहे.

यावर्षी सोयाबीनच्या बियाण्याचा तुटवडा अजिबात पडणार नसल्याचे दुकानदार सांगत असून, यावर्षी तुरीला बाजारात उच्चांकी दर मिळत असल्याने अनेक शेतकरी तुरीची बियाणे खरेदी करण्याला पसंती देत आहेत . याशिवाय नविन पीक असलेले राजमा या पिकांच्या पेरणीकडे सोयगाव तालुक्यांतील अनेक गावांतून ओढा वाढत असून शेतकरी बीबीएफ पध्दतीने ही व्हरायटी पेरणी करणार असल्याचे बोलले जात असून भाव चांगला असल्याने शेतकरी याकडे वळले आहेत .

# सोनारास गंडविणारा ठकसेन गजाआड

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** शेगाव येथील सराफा व्यापारी निलेश गणोरकर यांना गंडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या संभाजीनगर येथील ठगसेनास पोलिसांनी गजाआड केले आहे. विठ्ठल भालचंद्र सानप (५२, रा. राजीव गांधी नगर, सिडको, छत्रपती संभाजीनगर) असे आरोपीचे नाव आहे. त्याने शेगांव येथील सराफाकडून सोन्याचे पेंडल खरेदी केले. तसेच गहूमनी खरेदी करायचे आहे अशी बतावणी करून त्यानंतर सोन्याच्या ४६ गहू मणीचे वजन घ्यायचे आहे असे सराफाला सांगितले.

मोड म्हणून आपल्या जवळील काही दागिने त्यांना दिले असता गणोरकर याना दागिने नकली असल्याचा संशय आला. त्यांनी शेगांव शहर पोलिसांना माहिती दिली असत पोलीसानी सानप यास ताब्यात घेतले. त्याचेजवळून नगदी ८८ हजार व काही पांढऱ्या- पिवळ्या धातूचे वस्तू ,दागिने व बनावट चांदी चे दागीने जप्त केले. सराफा गणोरकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी सानप विरुद्ध भादवीच्या कलम ४२०,५११ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उप निरीक्षक आशिष गंद्रे करीत आहे.





# १३७ कवितांचा 'पुण्यश्लोक' काव्यसंग्रह जेजुरीत प्रकाशित

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या २९८ व्या जयंतीचे औचित्य साधून जेजुरी, ता. पुरंदर येथे शरदचंद्र भवन सभागृहात 'पुण्यश्लोक' या संपादित काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. या काव्य संग्रहामध्ये राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्यावर आधारित एकूण १३७ कवितांचे संकलन करण्यात आलेले आहे. हा काव्य संग्रह प्रकाशन सोहळा वेळापूरच्या माजी सरपंच विमल जानकर यांच्या अध्यक्षस्थानी संपन्न होत असताना प्रमुख पाहुणे म्हणून दिपाली पांढरे, रोहिणी रासकर, अनिता काळे व इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्राचे आराध्य दैवत खंडोबा व पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून व दीप प्रज्वलनाने झाली. काव्यसंग्रह प्रकाशना सोबतच काव्य लेखन स्पर्धेचा बक्षीस वितरण, पुण्यश्लोक पुरस्कार वितरण, काव्य संमेलन कार्यक्रम संपन्न झाला. काव्यसंमेलन हा कार्यक्रम गझलकार प्रमोद जगताप यांच्या अध्यक्षतेखाली व कवी अनंत राऊत यांच्या उपस्थितीत संपन्न करण्यात आला.सुजन फौंडेशन या सामाजिक संस्थेकडून राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्ताने राज्यस्तरीय काव्य लेखन स्पर्धा घेण्यात आल्या होत्या .या स्पर्धेत एकूण १३७ काव्य लेखन करणाऱ्या कवी/कवयित्री यांनी सहभाग घेतला होता. कवींना एकत्र आणून त्या कवींचे एका कविते द्वारे पुस्तकात येणे ही एक खूप मोठी संधी असून या काव्य संग्रहाचे संपादन करण्याचे महत्वपूर्ण काम संपादक म्हणून सामाजिक कार्यकर्त्या व ऑल इंडिया धनगरच्या अध्यक्षा पल्लवी चंद्रकांत मारकड-पारखे, सुजन फाऊंडेशनचे अध्यक्ष अजित संपतराव जाधव आणि कवी ज.तु.गार्डे ( कापशी ) यांनी केलेले असून राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनचरित्राचे व त्यांच्या धाडसी पणाचे विविध पैलू पुस्तकातून कवींकडून मांडण्यात आलेले आहेत.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दशरथ धायगुडे,अलका बनकर,मोहन बोरकर,बापूराव सुळ ,प्रशांत काळे, नितिन बिचुकले, व जेजुरीतील ज्येष्ठ नागरिक संघटनांचे पदाधिकारी यांचे विशेष सहकार्य लाभले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक पल्लवी मारकड,सूत्रसंचालन ज.तू.गार्डे आणि आभार प्रदर्शन अजित जाधव यांनी केले.यावेळी महाराष्ट्रातील विविध भागातून आलेले विविध क्षेत्रातील मान्यवर व कवी साहित्यिक उपस्थित होते.राज्यस्तरीय काव्य लेखन स्पर्धेतील प्रथम क्रमांक मंदाकिनी सपकाळ ( सांगली ),द्वितीय क्रमांक श्रीमती विद्या सरपाते ( बुलढाणा ),तृतीय क्रमांक योगिता मापारी ( सातारा ),स.ना.जोशी नांदेड व उत्तेजनार्थ श्रीगणेश शेंडे,दशरथ धायगुडे, मनीषा घुले,भारती पाटील व गणेश तांबे यांना गौरविण्यात आले. सुजन फाउंडेशनच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार माजी सरपंच विमल जानकर व दिपालीताई पांढरे यांना प्रदान करण्यात आला. तसेच अनितााताई काळे, अर्चना एखंडे ,ज्योती ठाकरे ,संगीता धायगुडे, सुचेता हाडंबर, वृषाली घाटगे, सीमा एकतपुरे, शबाना पठाण, लता धायगुडे या महिलांना कर्तबगार महिला २०२३ हा विशेष सन्मान देण्यात आला.

# कारवाई न करण्यासाठी पन्नास हजार रुपये लाच घेताना रंगेहात पकडले

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** बेकायदा वाळू साठ्याबद्दल



कारवाई न करण्यासाठी 50 हजार रुपये लाच घेतल्याबद्दल करजगी ( ता. जत ) येथील तलाठी बाळासाहेब शंकर जगताप ( वय 57 रा. आसंगी, गुडापूर रोड ता. जत ) याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली.

अधिक माहिती अशी, तक्रारदार यांच्या घराचे बांधकाम सुरू असून बांधकामासाठी वाळू आणली आहे. तलाठी जगताप याने सदरचा वाळूसाठा बेकायदा असून त्याबद्दल कारवाई न करण्यासाठी 50 हजार रूपये लाचेची मागणी केली. त्याबद्दल तक्रारदार यांनी 12 जून रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार अर्ज दिला.

तक्रारीनुसार पडताळणी केली असता तलाठी जगताप याने बेकायदा वाळू साठवणुक केली म्हणून कारवाई न करण्यासाठी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर आज तलाठी जगताप याच्या राहत्या घराजवळ सापळा लावला. तेव्हा तक्रारदाराकडून 50 हजार रुपये लाच रक्कम स्विकारली असता रंगेहात पकडण्यात आले. त्याच्याविरीध्द उमदी पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. तलाठी जगताप याला यापूर्वी 2014 तक्रारदार यांच्या खरेदी दस्ताची नोंद घेवून सातबारा उतारा देण्यासाठी दहा हजार रूपये लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले होते. तेव्हा त्याच्याविरूद मिरज शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना दुसऱ्यांदा लाच घेताना पकडण्यात आले.

> लाच स्विकारताना अटक करण्यात आलेले तलाठी बाळासाहेब जगताप हे माजी सैनिक असून जत तालूका तालाठी संघटनेचे अध्यक्ष देखिल आहेत . यापुर्वीही त्याच्यावर लाच स्विकारताना कारवाई झाली असून सर्वसामान्य शेतकऱ्यांची याच्याकडून कायमच लूट होत असते अशी तक्रारी आहेत...

उपअधीक्षक संदीप पाटील, निरीक्षक दत्तात्रय पुजारी, विनायक भिलारे, अंमलदार प्रितम चौगुले, ऋषीकेश बडणीकर, अजित पाटील, सलिम मकानदार, सुदर्शन पाटील, रविंद्र धुमाळ, पोपट पाटील, सिमा माने, उमेश जाधव, रामहरी वाघमोडे, चालक वंटमुरे यांनी कारवाई केली.

# वारकऱ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** सेवा आरोग्य फाऊंडेशनने आज कर्वेनगरमधे दोन ठिकाणी वारकऱ्यांसाठी आरोग्य तपासणी करून औषधोपचार केले. हिंगणे होम कॉलनी समाज मंदिरामधे अँलोपथी औषधे दिली. तर नंदादीप पाळणाघरात आयुर्वेदिक औषधे दिली. यामध्ये दिंडीमधील आलेल्या १४४ महिला व पुरुषांची तपासणी केली.
सर्दी, ताप, खोकला, पित्त, मुळव्याध आणि शरीर, सांधे दुखणे असे आजार आढळले. ८ डाँक्टर आणि ५ सेवा आरोग्य कार्यकर्त्यांनी आपली सेवा दिली. चांगली विचारपूस करून औषधे व मार्गदर्शन केल्याबद्दल वारकर्यांनी समाधान व्यक्त केले.



# विनायक मेटे यांच्या जयंतीनिमित्त नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**परतूर :** शिवसंग्रामचे नेते कै.आ विनायक मेटे यांचा जयंती निमित्त तालुक्यांमध्ये सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात यनार आहे. यामध्ये मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. आल्याची माहिती शिवसंग्रामचे तालुकाध्यक्ष सचिन खरात यांनी दिली आहे.. परतुर तालुक्यामध्ये विविध जिल्हा परिषद शाळेमध्ये शैक्षणिक साहित्य वाटप करून वृक्ष लागवड करण्यात यनार आहे. तसेच तालुक्यामध्ये नेत्र तपासणी शिबीर श्रीधर जवळा येथे डॉक्टर नांदे हॉस्पिटल नेवासा यांच्या संयुक्त विद्यमाने व कै.आ.विनायकराव मेटे साहेब यांच्या जयंती निमित्त नेत्र तपासणी मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करण्यात आले होते. घेऊन यामध्ये मोतीबिंदू बाधीत रुग्णांचे ऑपरेशन कमी खर्चात करून दायची, जिम्मेदारी शिवसंग्राम तालुका अध्यक्ष सचिन खरात यांनी घेतली आहे. यावेळी त्यांच्यासोबत उपस्थित सचिन खरात, आबासाहेब बागल, संदीप खवल, नितीन खरात, मनीष वाटाणे, अनिल दांगट, , अमृत राठी आधी तालुका पदाधिकारी उपस्थित होते.

# यवतमाळमध्ये बोगस बियाण्यांची विक्री

आधुनिक केसरी न्यूज



**यवतमाळ :** खरीप हंगाम अगदी तोंडावर आला असताना जिल्ह्यात बोगस बीटी बियाणे विक्रीस आले आहे. अनेक कृषी केंद्रातून या बियाण्यांची शेतकऱ्यांना विक्री होत आहे. राळेगाव तालुक्यात कृषी विभागाच्या कारवाईत तिघांना अटक करून बीटी बियाणे जप्त करण्यात आले. ही कारवाई मंगळवारी तालुक्यातील रिधोरा येथे करण्यात आली. प्रफुल्ल मोरेश्वर गोहकार ( २९, रा. वडकी ), निखील शालीक हाते ( ३१ ), नीलेश तुळसीदास कुडे ( २१, दोघेही रा. ऐकुर्ली ), अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. हे तिघेही राळेगाव ते वडकी रोडवरील रिधोरा फाटा चौकात प्रतिबंधित बिटी बियाणे विक्रीसाठी येणार असल्याची माहिती कृषी विभागाला मिळाली. त्यावरून कृषी विभागाने पोलीस विभागाशी संपर्क साधला. पोलिसांची मदत घेवून कृषी विभागाने रिधोरा फाटा चौकात सापळा रचला. यावेळी दोन दुचाकी बस निवाऱ्याजवळ येऊन थांबल्या. पथकातीलच पंकज बर्डे यांना ग्राहक बनवून पाठविण्यात आले. बनावट बिटी बियाणे असल्याचा इशारा मिळताच पथकाने छापा टाकून तिघांनाही ताब्यात घेतले. यावेळी एकूण एक लाख ४२ हजार १८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई कृषी विकास अधिकारी राजेंद्र माळोदे व पोलीस विभागाच्या पथकाने केली.

हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



महिला व पुरूषांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या
स्त्रीयांना होणाऱ्या समस्या
- मासिक पाळी अनियमित असणे
- हॉर्मोन्स चे असंतुलन
- मासिक पाळी अंगावरुन कमी किंवा जास्त जाणे
- PCOD बीज तयार न होणे किंवा न फुटणे
- मासिक पाळी बंद होणे
- वारंवार गर्भपात होणे
- श्वेत प्रदर (पांढरे जाणे)

पुरूषांना होणाऱ्या समस्या
- शुक्राणु कमी असणे
- शुक्राणुची गती कमी असणे
- शुक्राणु स्खलन
- स्वप्न दोष
- सेक्स इच्छा कमी होणे इ.

फीस - 300 रू.
संपर्क - डॉ मनोज जोशी 9822341176 (25 वर्षांचा अनुभव)
ऑनलाईन कन्सलटींग उपलब्ध
पत्ता : आयुर्वेदीक दवाखाना
सुपारी हनुमान रोड, छत्रपती संभाजीनगर.



# 'पंढरीचे ज्ञात-अज्ञात हिरे' पुस्तकाचे शानदार प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** पंढरपूरचे साहित्यिक व माजी मुख्याध्यापक दत्तात्रय शिवशंकर तरलगट्टी यांच्या चौथ्या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच संपन्न झाले. आजपर्यंत वेगवेगळ्या विषयांवर त्यांनी लेखन केले असून ते विविध वृत्तपत्रामधून वेळोवेळी प्रसिद्ध झाले आहेत. त्यांनी यापूर्वी पंढरी संचार मधून व्यक्तीचित्रणावर आधारित लेख मालिका प्रसिद्ध केली होती. विशेष म्हणजे त्यांनी अगदी अप्रसिद्ध व्यक्तींना प्रकाशात आणण्याचे कार्य केले आहे. ते सर्व 'पंढरीचे मानबिंदू " या पुस्तकात प्रसिद्ध केले आहेत. शिवाय काव्यसंग्रह व वाचनीय असा "वेध तिच्या मौनाचा" हा ललित लेखसंग्रह प्रसिद्ध केला आहे.


गुरुवार दि.८ जून रोजी त्यांनी व्यक्ती चित्रणावर आधारितच "पंढरीचे ज्ञात अज्ञात हिरे"हे चौथे पुस्तक प्रकाशित केले. या पुस्तकात त्यांनी पंढरीतील जुन्या अप्रसिद्ध व्यक्तींची चित्रणे लिहिली आहेत. या पुस्तकामुळे कमीत कमी तीन पिढ्याना वाचनीय ठरतील व माहिती मिळेल असे सर्व लेख असल्याने हे पुस्तक म्हणजे तीन पिढीला आदर्श ठरेल असा दस्तावेज ठरेल, असे हे पुस्तक आहे. प्रशंसनीय या कारणांमुळे की,त्यांनी हे पुस्तक त्यांच्या होणाऱ्या सुनबाई व अध्यात्मिक गुरु वे.शा.सं. दिलीपराव जोशी यांचे शुभहस्ते व सरांचे आईवडील व त्यांचे व्याही यांच्या उपस्थितीत हे प्रकाशन संपन्न झाले. हा कार्यक्रम सरांनी आपला मुलगा चि. प्रथमेश व कु.माहेश्वरी यांच्या साखरपुड्याच्या कार्यक्रमातच केल्यामुळे तरलगट्टी सरांच्या कल्पकतेची चर्चा पंढरीत रंगलेली होती.

# योगदिन उत्सव समिती अध्यक्षपदी सुभाष जावळे, सचिवपदी मोहन गंधर्व

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** परभणी- येथे जागतिक योग दिन उत्सव समिती च्या वतीने दरवर्षी 21 जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. याबाबत आज रविवार दि 11 जून रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत जागतिक योग दिन उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सुभाष जावळे तर सचिव पदी मोहन गंधर्व यांची एकमताने निवड करण्यात आली.

या बैठकीत योगासन स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, प्रभात फेरी, स्टेडियमवर सामुदायिक कार्यक्रम घेण्याचे ठरले आहे. या बैठकीत सुभाषराव जावळे, कृष्णा कवडी, मोहन गंधर्व, आशिष लोया, गजानन चौधरी, रामविलास लड्डा, आनंद कुलकर्णी, टिकाराम कदम, दिवाकर जोशी, अशोकराव शेलगावकर, डॉ धीरज देशपांडे, डॉ रवी भंडारी, डॉ सौ. जवादे, डॉ दीपक महिंद्रकर, डॉ शेळके, अनिल बडगुजर, गणेश पांचाळ, बाबुराव वसेकर, अरुण पाठक, प्रशांत जोशी उपस्थित होते.





परभणी येथील निरामय योग प्रसार व संशोधन केंद्र, योग साधना केंद्र, जिल्हा क्रीडा भारती, अखिल भारतीय योग महासंघ, परभणी योग संघटना, मुक्ताई योग संघटना, सत्य साई योग मंडळ, पतंजली योग संस्था, आर्ट ऑफ लिविंग, आरोग्य वर्धिनी योग शिक्षक संघ जिल्हा-परभणी आदी योग संस्था व संघटनांचे प्रतिनिधी सदर योग महोत्सव साजरा करण्यासाठी परिश्रम घेत आहेत. केंद्रीय आयुष मंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार जागतिक योग दिन महोत्सव साजरा करण्याचे या बैठकीत ठरले आहे. यासाठी योग शिक्षक यांच्या कार्यशाळेचे दि 15, 16 व 17 जून रोजी आयोजन केले आहे. परभणी व जिल्ह्यातील ज्या योग शिक्षकांना कार्यशाळेत सहभाग घ्यायचा आहे, अशा योगशिक्षक यांनी समितीच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# मुलीच्या अन्ननलिकेत अडकली जांभळाची बी

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** कुही तालुक्यातील मांढळमधील एका मुलीने जांभळाची बी गिळली. ती अन्ननलिकेत अडकल्यावर तिची खालावणारी प्रकृती बघत तिला सुपरस्पेशालिटी रुग्णालयात दाखल केले. येथील डॉक्टरांनी गुंतागुंतीची प्रक्रिया करून जांभळाची बी आणि आत अडकलेला शेंगदाणाही बाहेर काढला. सुपरस्पेशालिटी रुग्णालयातील डॉक्टरांच्या माहितीनुसार, लक्ष्मी ( बदललेले नाव ) या मुलीची अन्न आणि श्वासनलिका जन्मापासूनच निमुळती होती. त्यामुळे तिच्यावर एक शस्त्रक्रियाही झाली. त्यामुळे अन्ननलिका थोडी लहान झाली. ही बी तिच्या अन्ननलिकेत अडकली.

# शेतकरीविरोधी कायदे पुस्तिकेचे 18 जूनला लातूर येथे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** शेतकरी पारतंत्र्य दिनाच्या निमित्ताने शेतकरी संघटनेद्वारा लातूर येथे आयोजित केलेल्या शेतकरी मेळाव्यात अमर हबीब लिखित 'शेतकरीविरोधी कायदे' या मराठी पुस्तकाच्या नव्या आवृत्तीचे प्रकाशन होणार आहे.

पत्रकार भवन येथे दुपारी १ वाजता होणाऱ्या या मेळाव्याला शेतकरी संघटनेचे अध्यक्ष ललित बहाळे, 19 मार्च पासून जिल्ह्यात परिक्रमा केलेले अनंत देशपांडे, किसानपुत्र आंदोलनाचे अमर हबीब, डॉ. राजीव बसरगेकर, अमृत महाजन हे मार्गदर्शन करणार आहेत. शेतकरीविरोधी सीलिंग, आवश्यक वस्तू, अधिग्रहण व परिशिष्ट ९ च्या संबंधी सर्व शंका कुशंकांचे या पुस्तिकेत निरसन केले आहे. सीलिंग उठले तर पुन्हा जमीनदारी येईल का ? भांडवलदार येतील का ? स्वामिनाथन आयोगाची ती शिफारस शेतकऱयांच्या हिताची आहे का ? शेतकरी




आत्महत्याना कोण जबाबदार आहे ? अशा 37 प्रश्नांची उत्तरे या पुस्तिकेत वाचता येतील. अमर हबीब यांनी ही पुस्तिका लिहिली आहे. ते सुरुवाती पासून शेतकारी आंदोलनात सक्रिय राहिले आहेत. त्यांना पत्रकारितेचा दीर्घ अनुभव आहे. त्यांच्या लेखणीतून साकार झालेल्या या पुस्तिकेने शेतकरी प्रश्नाच्या गाभ्याला हात घातला आहे. या पुस्तिकेचे हिंदी व इंग्रजीत भाषांतर झाले आहे.



# उत्कट आशयभान हे येवले यांच्या कवितेचे वैशिष्ट्य

## डॉ. शोभा रोकडे : रुजवाई व विखुरलेले स्वप्नचांदणे ललित लेखसंग्रहांचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** प्रा.मीनल येवले हे कविता, ललित लेखन आणि समीक्षेच्या प्रांतातील परिचित नाव. नेहमी चांगले शोधण्याची, चांगुलपणाचा स्वीकार करण्याची दृष्टी लेखिकेला आहे. ही दृष्टी त्यांच्या लेखनातही दिसून येते' असे उद्‌गार 'रुजवाई' व 'विखुरलेले स्वप्नचांदणे' या दोन पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याचे अध्यक्ष सुप्रसिद्ध कादंबरीकार, ललित लेखिका, कथाकार सुप्रिया अय्यर यांनी मांडले. यावेळी प्रमुख अतिथी प्रा. गजानन मांडेकर म्हणाले,'आपले पती सुरेशरावांच्या स्मृतीदिनी दोन पुस्तके प्रकाशित करणे ही त्यांना वाहिलेली खरी भावांजली होय. सुरेशराव मीनलताईंच्या जीवनाशी अगदी एकरूप झाले होते.'

'मीनल येवले यांच्या कवितेत भावना आणि शब्द हातात हात गुंफून आत्ममग्न होऊन तरंगत चाललेत असे वाटते. या कवितेने स्वतःची एक ओळख निर्माण केली आहे. 'रुजवाई' ललित लेख संग्रहावर भाष्य करताना डॉ. लीना निकम म्हणाल्या,'रुजवाईतील ललित लेख हे सुंदर भावकाव्य आहे. त्यात भाषेचे लालित्य, नादमाधुर्य तर आहेच पण चिंतनशीलता सुद्धा दिसून येते. लेखिकेचे साहित्य हे तिच्या मनाच्या चार कप्प्यातून झुळझुळ वाहणाऱ्या झ-यासारखे झुळझुळत रसिकांच्या ओंजळीत येते. नात्याचा हळवा कप्पा, निसर्गाचा हिरवा कप्पा, काव्यप्रतिभेचा गुलबाक्षी कप्पा आणि समाधानाचा शांत कप्पा या चारही कप्प्यातून भरून आलेलं आभाळ तिने 'रुजवाई' मध्ये रितं केलेलं आहे. ती जेव्हा लेखांमधून अनुभवलेलं, जगलं-भोगलेलं जीवाचा कस लावून मांडते तेव्हा ललित गद्याला नव्हे आयाम देण्याची तिची क्षमता 'दिसून येते.'

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर